# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला, रविवार ता० ७ माहे डिवेंबर सन १८७९ इसवी. अंक ४७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

---

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०।०१ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

---

## नोटिस.

तीर्थरूप घाशीराम आजा गुलाबराय कान्यकुब्ज ब्राह्मण साहू दुकान पेठ मूर्तिजापुर यांस खालीं सही करणार आपले चरणाचा रज असें कळवितो कीं पुष्कळ दिवसांपासून गावचे लोक मला असें सांगत होते कीं तुमचे बापाचे बुद्धीमध्यें चळ पडला आहे. धन संपत्तीची अनेक रीतीनें नुकसानी करितात आणि बोलणें चालणें फार गैररीतीचें आहे. तर मी त्या गोष्टीवर लक्ष्य देत नव्हतो कां कीं माझा बाप ह्मणजे संभावित व फार वृद्ध सरकार दरबारांत लायकी मंजूर आहे आणि पुण्यशीलही आहेत तर मला या कामाची फार खुशाली होती. परंतु मी स्वतां जातीनें सरकारी शाळेंतील लायब्ररींत गेलों होतों व तेथें वर्तमानपत्रांत एक आश्चर्याची नोटिस पाहिली तेव्हां मलाही वाटलें कीं आतां खरोखरच तुमची बुद्धी ठिकाण्यावर नाहीं. किंवा लोकांचे फंदफितुरानीं किंवा ८० वर्षांचे वृद्धपणानें बुद्धींत फरक पडला आहे. तर आतां तुह्मी या नोटिसीवरून १५ दिवसांचे आंत कागदपत्र व धन संपत्ती व शेतीवाडी घरदार सुद्धां माझे स्वाधीन करावें आणि आपण बगईंत बसून भोगविलास व दान धर्म करीत जावा. मी आपला दास आपली अनेक रीतीनें सेवा करण्यास हजर आहे ही गोष्ट आपणास करणें भाग आहे. ह्मणजे तुह्मांस श्रीहरीनें त्या लायक केलें आहे आणि आपले मनांत फार चांगला शोचून विचार करावा. कर्माची रेषा काय आहे हें कोणास माहीत नाहीं. पूर्वीचे विचारांत आणि आतांचे विचारांत काय फरक आहे तो तुह्मी आपल्यावरून आपले मनांत समजावा. कोणाला विनाकारण त्रास देणें व गैरभाषण बोलणें आपणास उचित नाहीं. आतां लवकर सदर मुदतीच्या आंत वर लिहिल्याप्रमाणें करावें. नाहीं तर रीतीप्रमाणें तजवीज करणें मला भाग आहे. लोकांनीं तुमचा आणि माझा तमाशा पहाणें नीट नाहीं. कळावें हे विज्ञापना. तारीख ३० माहे नोवेंबर सन १८७९ इसवी.

( सही ) बाळाराम घाशीराम कान्यकुब्ज ब्राह्मण दुकान पेठ मूर्तिजापुर दस्तुर खुद.

---

## नोटिस.

रामजी वल्लद परशराम भेंडे पाटील मुकाम पाळवधी तालुके खामगाव जिल्हा अकोलें यास खालीं सही करणारा कडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे ८१। सवा एक्यायशी रुपयांच्या सालबंद्या येणें असून त्यांपैकीं, एकही सालबंदी तुह्मी दिली नाहीं. ह्मणून तुह्मांस ही नोटिस दिली आहे तर नोटिस पोंचल्या पासून ८ दिवसांत आमचे सर्व रकमेचा उलगडा करावा नाहींपेक्षां दिवाणींत तुह्मावर फिर्याद केली जाईल. व तिचा खर्च आणि या नोटिशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल. कळावें ता. ३।१२।७९

( सही ) शिवलाल गुलाबचंद दुकान निंबे तालुके बाळापुर.

---

## नोटिस.

मुद्या वल्लद विश्या महार रहाणार निंबे ता. बाळापुर जिल्हा अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, खाते बाकी तुह्माकडे येणें आहे त्याची सफाई आजवर केली नाहीं ह्मणून नोटिस दिली आहे तर नोटिस पोचल्या पासून ८ दिवसांत खात्याची सफाई करावी. न केल्यास दिवाणींत फिर्याद केली जाऊन खर्च भरून घेतला जाईल. व या नोटिशीचा खर्च ही तुह्मांस द्यावा लागेल. कळावें ता. ३।१२।७९

( सही ) शिवलाल गुलाबचंद दुकान निंबे ता. बाळापुर.

---

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

विनंती विशेष, मूर्तिजापुरीं तारीख २३ मिनहू रोजीं सरकारी मराठी शाळेंत वार्षिक परिक्षेबद्दल मुलांस बुकें बक्षीस वाटण्याचा समारंभ झाला त्याची हकीकत कळवितो ती:--

संध्याकाळचे ४ वाजण्याचे सुमारास शाळेंत बिछाईत वगैरे करून त्यावर खुरच्यांच्या ओळी अध्यक्षाच्या बसण्याच्या टेबलासमोर मांडल्या होत्या त्यांवर गावांतील शेट साहुकार देशमुख व वकील वगैरे ज्यांनां खुरच्यांच्या मानाचे दाखले आहेत ते येऊन प्रथम बसले नंतर पांच वाजण्याचे वेळीं मेहेरबान दोराबजी साहेब तहशिलदार, रा. रा. विठ्ठल बळवंत पोलिस इन्स्पेक्टर, रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट डे. इन्स्पेक्टर, रा. रा. व्यंकटराव मल्हार पेष्कार, सरकारी कारकून वगैरे सह शाळेंत स्वाऱ्या आल्यावर अध्यक्ष स्थान तहशिलदार साहेबांनीं स्वीकारलें नंतर मंडळी आपआपल्या अधिकाराप्रमाणें जागजागीं बसल्यावर डे. इन्स्पेक्टर यांनीं सभा भरण्याचा हेतु प्रदर्शित करून नंतर शाळेच्या पूर्वस्थितीची तुलना करून सांगितलें कीं दोन वर्षांच्या पूर्वीं या शाळेंत सुमारें ७५।८० मुलें असून हजर सरासरी ५०।६० राहत असत परंतु हल्लीचा हेडमास्तर रा. रा. वामन जिवनराव यांची हेडमास्तरच्या जागीं नेमणूक झाल्यापासून या शाळेच्या स्थितीस सुधारण्यास आरंभ झाला ह्मटलें तरी चालेल. ही शाळा सन १८६५ सालांत या गावीं स्थापन झाली तेव्हांपासून सुमारें १४ वर्षांत हल्लीं इतकीं मुलें या शाळेंत कधींच जमलीं नव्हतीं. हल्लीं पटावर मुलें १३७ असून हजरही सरासरी ९०।१०० असतात या वर्षीं मुलांच्या अभ्यासाबद्दलही हेडमास्तर यांनीं चांगली मेहनत घेतली. परीक्षेस एकंदर ६५ मुलें दिलीं होतीं त्यांपैकीं ५७ पास झालीं. पैकीं प्रत्येक इयत्तेतून पाऊणपटीपेक्षां ज्यास्त मुलें पास झालीं. पहिल्या वर्गांत तर १२ दिलीं होतीं त्यांतून १० पास झालीं. मुलांच्या मानानें व अभ्यासाच्या मानानें या ग्रेडच्या ज्या शाळा आहेत त्यांचीं व ह्या शाळेची तुलना केली तर त्यांत ह्या शाळेचा पहिला नंबर येईल. चांगली स्थिति शाळेस असल्याबद्दल हेडमास्तर यांची तारीफ करणें भाग आहे. व तसेंच रा. रा. विश्वनाथ आत्माराम भडंग व रा. रा. जोरावरसिंग हजारी यांनीं शाळेच्या कामांत चांगली मदत केल्याबद्दल शाळाखात्याच्या तर्फे इन्स्पेक्टर साहेब यांनीं त्यांचे आभार मानून तारीफ केली. याप्रमाणें त्यांचे भाषण झाल्यावर सरकारांतून १२ रुपयांचीं बुकें बक्षीस मिळालीं व मंडळींनीं आणखी ५ रुपयांचीं एकूण १७ रुपयांचीं बुकें तहशिलदार यांचे हातून वाटलीं. मुलांस मिठाई साठीं जोरावरसिंग हजारी यांनीं दोन रुपये दिले त्यांची मिठाई आणून मुलांस दिल्यावर पानसुपारी अत्तर गुलाब वाटण्याचे सुमारास रा. रा. रामराव गोविंद एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर आले. पूर्वीं येण्याचा त्यांचा बेत होता परंतु त्यांची प्रकृति थोडी बिघडली होती ह्मणून येण्यास विलंब झाला. पानसुपारीचें काम आटोपल्यावर लायब्ररी अगदीं मोडकळीस आली आहे तिचा जीर्णोध्धार करावा याबद्दल विचार चालू होऊन ठरलें कीं लोकांकडून पैसा येणें आहे तो वसूल करून ज्यांचें देणें आहे त्यांनां अगोदर आदा करावें व नवीन कांहीं वर्गणीदारांचीं नांवें दाखल करावीं असें ठरवून त्या कामाची यादीही झाली आहे. याप्रमाणें सभेचें काम आटोपल्यावर मंडळी आपापल्या घरीं गेली.

मेहेरबान डायरेक्टर साहेब यांची स्वारी तारीख १८ मिनहूस एथें येऊन त्यांनीं शाळा तपासली व शेरा चांगला दिला व पूर्वीं पाहिल्या स्थितीपेक्षां हल्लीं सुधारणा ज्यास्त झालेली पाहून आपला आनंद प्रदर्शित केला. मात्र एथील हिंदुस्थानी शाळेंत मास्तराची अव्यवस्था पाहून नाखुष झाले असें ऐकतों. येणेंप्रमाणें हकीकत कळविली आहे मर्जीनूरूप तजवीज होईल. कळावें तारीख २७ नवंबर सन १८७९ इसवी.

एक "मूर्तिजापुरकर"

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेले चार ओळींस आपले येत्या अंकीं जागा मिळेल अशी आशा बाळगून विनंती करितों.

मी लोणार एथील धारातीर्थावर फिरत फिरत स्नानाकरितां येऊन उतरलों. तेथें एक चमत्कारिक गोष्ट माझे पाहण्यांत आली. तीर्थावर ब्राह्मण मंडळी बरेच सभ्य सभ्य गृहस्थ जमले असोन त्यांत एका गृहस्थाचा क्षौर केला होता. त्यावरून विचारणा केल्यांत क्षौराचें कारण समजलें तें—

लोणार येथून दोन कोसांवर एका खेडे गावांत ( अ ) नें आपला बैल ( ब ) चे स्वाधीन केलेला ( ब ) यानें बांधला व त्याच ठिकाणीं बैल मरण पावला.

लोणार क्षेत्रावर धर्मशास्त्राप्रमाणें क्षेत्रस्थ मंडळीनें बांधलेल्या ठिकाणीं बैल मरण पावल्यामुळें (ब) बैल बांधणारा याचा क्षौर करवून प्रायश्चित्त देऊन त्यास शुद्ध केलें परंतु ( अ ) बैलाचा मालक दोषी ठरवून ( ब ) प्रमाणें क्षौर विधीचा अपराधी जाणून त्याचा ही क्षौर करवून प्रायाश्चित्त देऊन त्यास मुक्त केलें.

क्षेत्रस्थ मंडळीनें सशास्त्र केलें असेलच. ( ब ) अपराधी झाल्याचा कांहीं संशय वाटत नाहीं परंतु ( अ ) कशाप्रकारें दोषी ठरला असेल हा स्पष्ट रीतीनें खुलासा न समजल्यामुळें आपले पत्रद्वारें प्रसिद्ध होऊन विद्वज्जन मंडळीकडून याचा खुलासा मिळावा अशा आशेनें विनंती केली आहे. पत्रद्वारेंच खुलासा मिळेल ही आशा बाळगून आहो.

( अ ) बैलाचा मालक दोषी होतो असें कोणते ग्रंथांत आहे तें कळवा ह्मणून मी क्षेत्रस्थ मंडळीस विनंती केली, परंतु त्यानीं मजला ग्रंथाचें नाव कळविलें नसून एक लहानशी चिठ्ठी दोन श्लोकांची मजला दाखविली तीवरून ग्रंथाचें नाव न समजल्यामुळें आणि ( अ ) याजला मालकी बदलचें प्रायश्चित्त दिलें असें वाटल्यावरून संशय दूर होण्याकरितां लिहिलें आहे. मागें याचप्रमाणें आह्मीं करीत आलों ह्मणून मंडळी ह्मणत होती तेव्हां वहिवाटीवरून असें केलें असेल कीं काय? करितां खुलासा मिळालेप्रमाणें क्षेत्रस्थही पाहून या क्षेत्रीं असलेली वहिवाट शास्त्रविरुद्ध असल्यास दूर करितील. कारण क्षुल्लक कामाकरितां क्षौराविधी होणें बरोबर दिसत नाहीं. कळावें हे विनंती.

एक "फिरस्ता."

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० मी मूर्तिजापुर एथील पोलिस स्टेशनमध्यें माझे एका मित्राचे भेटीकरितां

गेलो. तेव्हां तेथें एक मूर्तिजापुर तालुक्याचा नकाशा समोर भिंतीला टांगला होता. मी त्या तालुक्याचा गैर माहितगार असले कारणानें त्या नकाशाजवळ जाऊन मला ज्या गावास जावयाचें होतें तो रस्ता नीट समोरच्या त्या नकाशावर शोधावयास लागलों. इतक्यांत थोडे अंतरावर लिहित बसलेले कान्स्टेबल ( नवीन आलेले ) यांनीं आपली मुद्रा बदलली व मज गरीब मुशाफरावर शद्बांचा वर्षाव सुरू केला. मी गरीब मनुष्य कांहीं न करितां भिऊन त्या रावसाहेब ह्मणविणारे कान्स्टेबलाचे जोड्याजवळ बसलों. सद्येपुढें शहाण पण कोठें आहे? खरेंच त्या लोकांना नकाशों ह्मणजे काय त्याचा उपयोग काय हें जेव्हां कळूं लागेल तेव्हां देशाचा भाग्योदय झाला असें होईल. नकाशा ह्मणजे कांहीं तरी चित्र टांगून ठेवण्याकरितां सरकारांनीं दिलें आहे असा त्यांचा समज असेल काय? असो अशा लोकांवर वरिष्ठ अधिकारी पूर्ण लक्ष देतील अशी आशा आहे. कळावें तारीख २७-११-७९ इसवी.

एक
" फिरस्ता "

---

### प्रश्न.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि०-- निपुत्रिक विधवा मृत झाली. तिला दोन कन्या व एक तीन पिढ्यांचे अंतराचा पुतण्या असे वारस आहेत. मय्यत औरतेची स्थावर जिंदगी आहे या स्थावरावर वारसाचे संबंधानें हक्क कोणास मिळावा? मुलीस किंवा पुतण्यास याविषयीं वचनसहित आधार मिळावा. कळावें.

तारीख ४ डिंसेबर सन १८७९ इसवी.

एक
पृच्छक.

---

## नोटिस.

राघोजी माळी खिरसागर वस्ती मौजे माडक प्रगणें पिंपळगाव ता० मलकारपुर यांस खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं माझी मुलगी तुमचे मुलास दिली आहे तिचें पालन पोषण तुह्मी करीत नाहीं त्याबद्दल असें ऐकतों कीं तुह्मी तिचे क्रियाकर्मांतर केलें आहे. तर तें जिवंत असतां तुह्मी कर्मांतर कसें केलें हा फार आश्चर्याची गोष्ट आहे. ही गोष्ट खरी किंवा खोटी तें समजणें अवश्य आहे. मरणाची गोष्ट कोणाचे सांगितल्यावरून समजली असेल तर तुह्मी आमचे घरीं येऊन शोध घेण्याचा होता. तसें केलें नाहीं ही तुमची चूक आहे. जी गोष्ट होऊं नये ती झाली. तर आमचें ह्मणणें इतकेंच कीं तिचा विधी आपल्यांत येण्याचा धर्मशास्त्राआधारें करून पुन्हा तुह्मी अंगिकार करावा हें उत्तम आहे. या नोटिसीचा जबाब नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत द्यावा. तसें न केल्यास तुह्मावर फौजदारींत अगर नुकसानी बद्दल दावा करूं. कळावें तारीख ६ डिंसेबर सन १८७९ इसवी.

( सही ) सोनाजी वलद जानजी माळी चोपडे सावरगाव ता. जळगाव निशाणी खुद.

---


# वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक वद्य ९ शके १८०१


---

## कोल्हापुरचे राजे.

या राजे साहेबास सरकारांनीं राजकोटास विद्याभ्यासाकरितां ठेविलें होतें व तेथें ते अभ्यास करीत असत. अलीकडे त्यांची प्रकृति बिघडली असा बोभाट झाल्यावरून ते कोल्हापुरास जाण्याकरितां मुंबईस आले. सरकारानें पुढें त्यांस हवा बदलण्यास महाबळेश्वरास पाठविलें. कोणी अशी कंडी पिकविली आहे कीं महाराजांचे बुद्धीस भ्रम झाला आहे तसेंच कामविकारानें त्यांस फार पीडित केलें आहे अशाही बातम्या पसरल्या. नंतर याची बरीच विचक्षणा होऊन शेवटीं असा बूट निघाला कीं प्रस्तुतचे त्यांचे कारभारी रा. ब. माधवराव वासुदेव बर्वे यांपासून त्यांस फार जाच होत आहे. त्यांचें त्यांचें पटत नाहीं. व त्यांचीच मंडळी महाराजांस भ्रम झाला व कामविकार झाला अशा कंड्या उठवितें. महाराज अगदीं त्रस्त झाले आहेत. असल्या पीडेंत रहाण्यापेक्षां राज्यपद सोडून आपल्या मूळच्या गरिबीच्या घरीं जाऊन मोकळें रहावें हें फार चांगलें असेंही त्यांस वाटूं लागलें आहे. व ते तसे आपले उद्गार आपल्या पूर्व मातुश्रीच्या भेटीच्या प्रसंगीं त्यांनीं बोलूनही दाखविले असें ह्मणतात. सरकारानें या बाबतींत काय तजवीज केली तें अजून बाहेर पडलें नाहीं. परंतु गवगवा फार झाला आहे. त्या अर्थी सरकार स्वस्थ बसणार नाहीं.

आह्मांस फार आश्चर्य वाटतें कीं दक्षिणेतील एका फार मोठ्या राजपुत्राची अशी स्थिति झाली. कोल्हापुरचे राजे शिवाजी महाराजांचे वंशज असून नामांकित आहेत. हल्लींच्या राजाच्या पूर्वींचे राजे विलायतेस गेले होते व तिकडेच त्यांचें देहावसान झालें. त्यांमागें राणी साहेबांनीं हल्लींचे महाराज इंग्रज सरकारच्या विचारानें व संमतीनें दत्तक घेतले आहेत. व हे चांगले बुद्धिमान व तरुण आहेत. आणि इंग्लिश अभ्यास करीत आहेत तेव्हां लवकरच नावारूपास येण्याचे त्यांचे दिवस अशा संधींत हल्लींचा जो प्रकार घडत आहे तो फारच दुष्ट समजला पाहिजे. सबब याचे खरेपणाची सरकारानें अवश्य व सत्वर खातरी करावी. आणि खरोखर प्रकृतीचा विकार असल्यास त्यांस उत्तम डाक्तराकडून औषधोपाय करवावा. आणि तसें नसून कारभाऱ्याचा जाच असल्यास त्या जाचांतून त्यांस मुक्त करावें. राजाचा कारभारी झटला ह्मणजे हाताखालचा नोकर होय. तोच शिरजोर होऊन भलतीं कृत्यें करूं लागला व त्यापासून राजाचें अंतःकरण उद्विग्न होऊन त्यांस व्याधी जडूं लागली तर तसला कारभारी हाच महा रोग समजून तो काढून टाकला पाहिजे. मुंबई इलाख्यांतील वर्तमानपत्रांतून या विषयीं पुष्कळ वाटाघाट चालली आहे असें असतां सरकारचा विचार काय झाला व सरकारानें काय चौकशी चालविली आहे हें कांहींच बाहेर पडत नाहीं. त्यामुळें लोक फार काळजींत आहेत सबब आह्मी पुन्हाहि ह्मणतों कीं महाराजास मुख्या रोगाची किंवा चालत्या बोलत्या रोगाची पीडा असल्यास तिचा परिहार करावा. पहिला असल्यास जागच्या जागीं नाहींसा करावा व दुसरा असल्यास काढून टाकावा. कसेंही करून राजरत्न निर्दोष ठेवावें.

---

## वऱ्हाडांत वकिलीच्या परीक्षा सुरू करण्याची अवश्यकता.

वऱ्हाडप्रांत इंग्लिश सरकारच्या ताब्यांत आल्यापासून इसवी सन १८६२।६३।६४ आणि ६७ या सालांत एकंदर वकिलीच्या पांच परिक्षा झाल्या आणि त्या वेळीं ज्या ज्या लोकांच्या परिक्षा उतरल्या तेवढ्याच लोकांना वऱ्हाडांत वकीली करण्याची परवानगी मिळाली. अशा वकिलांची संख्या सन १८७३ सालच्या अखेरीला ११४ होती पुढें एक वर्षानंतर ह्मणजे सन १८७४ च्या शेवटीं फक्त १०४ राहिली. सन १८६७ सालापासून परीक्षा घेऊन नवीन सनदा देण्याचें बंद झालेंच होतें. पुढें कालचक्रांत जे जे सांपडले ते आणि दुर्वर्तनामुळें वगैरे ज्या वकिलाच्या सनदा रद्द केल्या ते लोक वजा सन १८७६ अखेर फक्त १०२ वकील राहिले. याप्रमाणें दिवसानुदिवस सृष्टीच्या नियमा प्रमाणें लोक संख्या वाढत जात असतां दुर्दैवानें वकिलांची संख्या कमी होत चालली या कारणास्तव ह्मणा किंवा दुसऱ्या कोणत्या कारणास्तव ह्मणा वकिलांची संख्या जास्त व्हावी असें सरकारास वाटल्यावरून मुंबई आणि आलहाबाद वगैरे ठिकाणच्या कांहीं वकील लोकांस वऱ्हाडांत वकीली करण्याची परवानगी अलीकडील दोन तीन वर्षांपासून आमचें सरकार देऊं लागलें आहे. आणि इतकेंही असतां सन १८७८ च्या अखेरीस वऱ्हाड प्रांतांत वकीली करणारे लोक फक्त ९२ होते. आतां वऱ्हाडांत सुमारें २२ लक्ष प्रजेचें सर्व काम करण्याला फक्त ८२ वकील ह्मणजे सुमारें २३,९१३ लोकांस किंवा ठोकळ आकडे घेतले ह्मणजे २४,००० लोकांस एक वकील हें मान पडतें. उदाहरणार्थः— उमरावती शहरांतील लोकसंख्या सुमारें २४,००० हजारांचे जवळजवळ आहे. आणि इतक्या सर्व लोकांस कायद्याचें काम पडल्यास त्यांनां काय तो एकच वकील आहे असें जर आपण समजलों आणि सर्व २४००० लोकांचें काम एका वकिलाच्या हातून व्हावयाचें झटल्यास लोकांनां जितकी अडचण पडेल तितकीच अडचण वऱ्हाडवासी प्रत्येक मनुष्याला पडेल असें समजलें पाहिजे. आतां ह्यावरून पहातां २४००० त एक वकील हें मान झटलें ह्मणजे फार कमी आहे याकारितां वऱ्हाडांत यापेक्षां जास्ती वकील असणें जरूर आहे. आणि अन्य प्रांतांतील वकिलांस या प्रांतांत वकीली करण्याच्या परवानगीच्या सनदा सरकार अलीकडे देऊं लागलें आहे. यावरून सरकारचे मनांतही इकडील वकिलांची संख्या वाढविण्याची अवश्यकता आली आहे हें स्पष्ट आहे. परंतु ती संख्या वाढविण्याकरितां सरकारानें जो मार्ग स्वीकारिला आहे तो मार्ग मात्र अगदीं न्यायाचा आहे असें आमच्यानें ह्मणवत नाहीं.

कोणत्याही देशांत जें काम तद्देशीय लोकांच्या हातून होण्यासारखें आहे तेंच काम करण्याकरितां अन्य देशांतून लोक आणविले असतां तें कसें न्याय्य होणार नाहीं. आणि हा जो सिद्धांत सर्व देशाविषयीं खरा आहे तोच सिद्धांत सर्व प्रांतांविषयींही खरा आहे आणि वऱ्हाड शिवाय करून इतर सर्व ठिकाणीं सरकाराचें वर्तन या नियमास अनुसरूनच आहे. मुंबई इलाख्यांतील जिल्ह्या निहाय कोर्टांत वकीली करण्या कारितां मुंबई हायकोर्ट मुंबई इलाख्यांतील लोकांचीच परीक्षा घेऊन सनदा देतें. मद्रास इलाख्यांतील किंवा मध्य प्रांतांतील वगैरे इतर ठिकाणच्या वकिलांस मुंबईच्या जिल्हा कोर्टांतून वकीली करण्यास परवानगी नाहीं. मद्रास इलाख्याचेही स्वतःचे वकील आहेत. नागपुर प्रांताचेही स्वतःचे वकील आहेत. त्या प्रांतांनांही मुंबई किंवा मद्रास इलाख्याचे तीं ढाकडे वकिलाकारितां पहावें लागत नाहीं. याचप्रमाणें इतर सर्व प्रांतांचेही ज्याचे त्याचे वकील आहेत. आणि त्यांची संख्या भाणली वृद्धिंगत करण्याकरितां दरसाल परीक्षा सुरू आहेत. इतकें असतांही आमचे सरकार या वऱ्हाड प्रांताकरितांच बाहेरच्या वकील लोकांनां परवानगी कां देतें हें आमच्यानें सांगवत नाहीं. मात्र असें केल्यानें वऱ्हाडवासी लोकांचा एक अमोलिक हक्क अन्यायानें मारला गेला असें मात्र यांत साफ होतें असें ह्मणावें लागतें याकारितां एथेंच परीक्षा घेण्याचा क्रम सुरू करून वऱ्हाडवासी लोकांच्या हक्काचें संरक्षण व्हावें असें आमचें ह्मणणें आहे.

आतां कोणी असें ह्मणेल कीं मागें या परीक्षा सुरू होत्या वेळीं जे जे वऱ्हाडी वकिलींत पास झाले ते फार हुशार नाहींत आणि एवढ्याकरितां बाहेरगावचे वकील आणणें सरकारास भाग आहे. परंतु नीट विचार करून पाहिलें ह्मणजे हें ह्मणणें अगदीं गैरमाहितीचें आहे असें दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं, कारण कीं परीक्षा चालू होत्या त्या वर्षीं जरी वकील फारसे हुशार नसले तरी फारसे नवल नाहीं. उत्तम वकील किंवा उत्तम डाक्तर परीक्षा दिल्याबरोबर लागलाच कधींहि व्हावयाचा नाहीं. या दोन्हि धंद्यांत आणि त्याच प्रमाणें बहुतेक इतर सर्व धंद्यांत प्रवीणता होण्याला अनुभविक ज्ञानाची विशेष अवश्यकता आहे. आणि या नियमाप्रमाणें वऱ्हाडांतील वकिलांची स्थिति अलीकडे दिवसानुदिवस पुष्कळ सुधारत चालली आहे असें इकडील न्याय खात्यांतील मुख्य अधिकारी यांचें ह्मणणें आहे, सन १८७६ सालच्या न्यायखात्याच्या वार्षिक रिपोर्टांत मेहेरबान जुडिशियल कमिशनर साहेब असें ह्मणतात कीः—

" आमच्या स्वतांच्या कोर्टांत वकीली करणाऱ्या वकिलांपैकीं कांहीं वकिलांपासून आह्मांला मोठी मदत होते असें आह्मी मानतों. ज्या मोकदम्यांत ते वकील पत्र घेऊन येतात त्या मोकदम्यांची सर्व कच्ची हकीकत नेहमीं माहित करून घेऊन येणार वकील

जर्नल ह्मणजे सदाशीव नारायण, देवराव विनायक, पांडुरंग गोविंद, हे होत. याचप्रमाणें पुढें सन १८७७ सालचे रिपोर्टांतही मे. जुडिशियल कामिशनर साहेबांनीं असें ह्मटलें आहे कीं:—

"साधारणपणें ह्मटलें ह्मणजे वकिलांची पुष्कळ सुधारणा झाली आहे."

त्याप्रमाणें आमचे इलाख्याचे सरकार आलीशान रेसिडेंट साहेबांचेंही मत याचप्रकारचें आहे. यावरून लक्षांत येईल कीं बाहेरचे वकील इकडे आणण्याची अवश्यकता आतां उरली नाहीं. अशा प्रकारची अवश्यकता होतीच ह्मटली तर पूर्वीं ज्या वेळीं इकडील वकील "सुधारले" नव्हते तेव्हां होती आतां उरली नाहीं; शिवाय सन १८७६ सालच्या रिपोर्टांतून जो वर उतारा दिला त्यांत लिहिलेल्या तीन हुशार वकिलांपैकीं शेवटचें नाव अगदीं केवळ वऱ्हाडी वकिलाचें आहे हेंही आमच्या मार्मिक वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

आतां दुसरे पक्षीं कोणी कदाचित असें ह्मणतील कीं मुंबई वगैरे कडील वकील हुशार असतात तर हें ह्मणणेंही पूर्वींच्या प्रमाणेंच अगदीं अज्ञानमूलक आहे असें ह्मटलें पाहिजे. कारण कीं बाहेरून एथें आलेल्या वकिलांच्या हुशारीबद्दल जरी आह्माला तिळप्राय शंका नाहीं तरी अन्य ठिकाणीं ज्याणीं नाव लौकिक मिळविला आहे असे विद्वान आणि हुशार वकील आपआपलीं कोर्टें सोडून मुलुख अमानी हैद्राबाद एथें वकीली करण्याकरितां येतील असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. नागपुर, जबलपुर, अलाहाबाद आणि मुंबईत ज्यांची हुशारीविषयीं प्रसिद्धि आहे अशा लोकांतून कोणी येऊन वऱ्हाडांत राहिला आहे असें आमच्या पाहण्यांत आलें नाहीं. यावरून पहातां वऱ्हाडांत वकीली इच्छिणारे बाहेरचे वकील ह्मटलें ह्मणजे ज्यांनां अन्यत्र ठिकाणीं फारशी प्राप्ती नाहीं तेच लोक होत. मग अशा लोकांकरितांच बाहेरून वकील आणण्यांत अर्थ तो कोणता? यापेक्षां एथल्या एथेंच परीक्षा सुरू केल्यास सरकारचें कामचें काम होऊन रयतेलाही पुष्कळ फायदे होणारे आहेत.

सरकारी व इतर शाळांतून शिकून दरसाल जे लोक तयार होतात त्याणीं आतां पुढें काय करावें हा एक मोठा प्रश्न आहे. वकिलीच्या परीक्षा सुरू केल्यास अशा लोकांना एक द्वार होईल इतकेंच नव्हे परंतु त्यांचे योगानें इकडील गरीब अनाथ प्रजेस उपजीविका करण्याकरितां सरकारांतून एक साधन दिल्या प्रमाणें होईल.

या शिवाय या परीक्षा सुरू केल्यानें आणखी एक अप्रत्यक्ष असा फायदा होणार आहे कीं परीक्षा देण्याच्या आशेनें पुष्कळ लोक कायद्यांचा अभ्यास करूं लागतील, तेणेंकरून एकंदर प्रांताचे कायद्याचें ज्ञान वाढेल आणि एकंदर प्रांतांतील सर्व लोकांचें ज्या मानानें कायद्यांचें ज्ञान वाढेल त्या मानानें सर्व लोक ज्यास्त कायदेशीर वर्तन करूं लागतील व त्यामुळें अर्थांत गुन्ह्यांचा व निरर्थक दाव्यांची संख्या कमी होऊं लागेल.

"लीगल प्राक्टिशनर्स आक्ट १८७९ ह्मणजे चालू सालीं पास झालेला वकील वगैरे लोकांविषयींचा कायदा ज्यावेळीं वऱ्हाड प्रांतास लागू होईल त्यावेळींच सदर्हू परीक्षेबद्दल नियम करून त्या एकवार चालू कराव्या. असें केल्यानें सरकारचें कोणत्याही प्रकारचें नुकसान न होतां त्या उमेदवारांपासून फीच्या रूपानें आणि पास झालेल्या लोकांपासून सनदेबद्दल त्या खर्चापुरतें उत्पन्न होण्याचा संभव आहे.

आतां ह्या परीक्षांचे संबंधानें आह्मांस पुष्कळ सूचना करावयाच्या आहेत त्या पुढें प्रसंगानुसार करण्यांत येतीलच. तूर्त इतकेंच लिहितों कीं परीक्षा घेणें त्या केवळ इंग्रजी भाषेंतच न घेतां पहिल्या वर्षीं तरी फक्त मराठी जाणणाऱ्या उमेदवाराला परीक्षा देण्याची मोकळीक असावी. पुढें फक्त इंग्रजींतच झाल्या तरी हरकत नाहीं. हा तरी पहिल्यानें एकदां अशा प्रकारची अडचण नसावी.

इंग्रजींत परीक्षा देऊं इच्छिणाऱ्या लोकांस म्याट्रिक्युलेशनची इयत्ता नसावी. कारण कीं आपल्या वऱ्हाडच्या हायस्कुलांतून आजपर्यंत म्याट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेले लोक फार थोडे आहेत. याकरितां इंग्रजींत शुद्ध रीतीनें बोलतां आणि लिहितां येत असल्याविषयींचे दाखले असले ह्मणजे त्याला परीक्षेंत घेण्याची मोकळीक असावी.

तसेंच परीक्षेकरितां विषय नेमणें त्यांत मुसलमानी आणि हिंदु धर्मशास्त्रें आणि वऱ्हाडास लागू असणोर सर्व कायदे हे असावे.

आणि याशिवाय शेवटची परंतु सर्वांत विशेष महत्वाची सूचना ही कीं एथील परीक्षेकरितां वऱ्हाडी लोक किंवा वऱ्हाडांत स्थायीक राहून ज्यांनां चार किंवा पांच वर्षें झालीं आहेत असे अन्य प्रदेशचे लोक यांशिवाय कोणासही मोकळीक नसावी.

---

## वऱ्हाड.

---

रा. रा. देवराव विनायक वकील यांस वऱ्हाडांत गवरमेंट प्रासिक्युटर कायमचे नेमिलें हें कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो.

जुडिशियल कामिशनर साहेब मूर्तिजापुराहून पुढें गेले. त्यांचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. भास्कर सखाराम जयवंत स्वारींत गेले होते. व मुनसफ कोर्टें वऱ्हाडांत करण्याचा पुन्हा विचार झाला आहे असें ऐकण्यांत येतें. ही योजना झाली असतां अकोल्याचें व खामगावचें स्माल काज कोर्ट बंद होईल व फक्त उमरावतीचें राहील असें ह्मणतात.

अडगाव कोर्टास काम फार पडतें. व रा. रा. केशव महिपत खारकर तेथील एक्स्ट्रा असिस्टंट कामिशनर हे फार मेहनत घेतात यामुळें त्यांची प्रकृती बिघडत चालली त्यामुळें ते रजा घेणार ह्मणतात.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर बुल्ढाणें जिल्ह्यांत जाण्याकरितां हिवरखेडास गेले तों त्यांची प्रकृति बिघडली त्यामुळें ते मागें आले. हल्लीं प्रकृति बरी होत चालली आहे. लवकरच पुन्हा स्वारींत जातील.

पंढरपुरच्या पुराण सांगणाऱ्या सौ० अनुसूया बाई मंगळवारीं खामगावाकडून पुढें गेल्या. रविवारीं त्यांची पुराणसंभावना झाली. मंडळी विशेष जमली नव्हती.

मि० डनलाप साहेब असिस्टंट कामिशनर विलायतेस रजेवर गेले होते ते या आठवड्यांत आलेल्या आगबोटींतून मुंबईस आले. आज उद्या एथें येतील. व डिपुटी कमिशनरचे काम पाहू लागतील आणि मि. किट्स साहेब खामगावास जातील ह्मणतात.

मि. अबदुल हक्क कर्नाळकर वऱ्हाडांतील असिस्टंट कामिशनर एक वर्षाची रजा घेऊन हैदराबादेस कामावर आहेत. त्यांनी आणखी एक वर्षाची रजा मागितली व ती मंजूर झाली. या रजेंत त्यांस कांहीं इकडील नेमणूक मिळणार नाहीं.

हिंदुस्थानांतील गव्हाची लागवड, त्याचे प्रकार, पीक, खप वगैरे विषयीं सरकारानें पुष्कळ शोध केला व तें सविस्तर प्रकरण विलायतेस जाऊन तेथील सरकारचे अभिप्रायासहित छापून प्रसिद्ध केलें आहे. त्याविषयीं आह्मी पुढें लिहू. वऱ्हाडांतील वाशीम व वणी खेरीज करून सर्व जिल्ह्यांतील मासले गेले होते. इकडील गहू मध्यम ठरला. व बनसी गव्हास ४१ पासून ४१॥ सिलींगाचा भाव लागला. दोन वर्षांपूर्वीं गव्हाची लागवड ९३७८३० जमीनींत झाली होती. दर एकरास २४४ रत्तल पीक झालें. २३७३७० मण गहू बाहेर देशीं गेला. व १९६२६४४ मण गहू वऱ्हाडांत निर्वाहाकडे लागला असें लिहिलें आहे.

मेजर ग्रांट सा. व मे. फिटझरल्ड सा० विलायतेस रजेवर आहेत त्यांस इकडे येण्याची परवानगी मिळाली.

मेजर फ्यारर सा. इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिस सहा महिन्यांचे रजेवर पुढील महिन्यांत विलायतेस जाणार आहेत.

अलीशान रेसिडेंट साहेबांची स्वारी १३वे तारखेस हैदराबादेहून निघून १७ वीस एथें येणार आहे. येतांनां मलकापुरास सकाळीं अर्धा तास थांबून तेथें आफिसर लोकांच्या भेटी होणार. २०वे तारखेस अकोल्यास दरबार होईल. व त्याच वेळीं मे. दस्तुर बहिमनजी सा. यांस कंप्यानियन आफ धि इंडियन एंपायर या पदवीची आर्डर देण्याचा समारंभ होणार. नंतर उमरावतीस जाऊन तेथें दरबार होईल व पुढें इलिचपुरास जातील असें समजलें आहे.

कारंजाचे अक. स्कूलमास्तर रा. रा. अंताजी नारायण वेचलेकर यांस कायम केलें. रा. रा. रामचंद्र यशवंत गोडबोले यांस मलकापुरास फर्स्ट असि. मास्तर नेमिलें. रा. रा. गोविंद व्यंकाजी खोत यांस उमरावती हायस्कुलांत ५० रु. चे असि. मास्तर नेमिलें. रा. रा. रामचंद्र नारायण साधले यांस त्याच हायस्कुलांत अक. असि. मा. ५० रुपयांवर नेमिलें. रा. रा. सिताराम सदाशिव चितळे यांस इलिचपुरास फर्स्ट असिस्टंट मास्तर नेमिलें व रा. रा. गोविंद नारायण चिकाटे यांस उमरावती मिडल क्लास स्कुलांत २५ रु. असि. मास्तरचे जागेवर परत पाठविलें.

इलिचपुर—थंडीनें आपला अमल पूर्ण बसविला आहे. रात्रंदिवस कांहीं काम काज वगैरे सूचत नसून घराचे बाहेर पाऊल टाकावेंसें वाटत नाहीं, या थंडीपासून बहुतेक पिकाचें नुकसान झालें असें शेतकरी लोक बोलत आहेत.

मे० नूरखा साहेब हिंदुस्थानी शाळांचे डे. इन्स्पेक्टर यांची स्वारी एथें आली.

रा. रा. परशराम गणेश रोविन्‍दु शिरस्तेदार हे रजेवरून परत आले.

कुत्रीशी संभोग करणारे मनुष्यास तीन वर्षांची सजा झाली.

सालाबादप्रमाणें पौर्णिमेस बहिरमची यात्रा भरली होती. दरसालपेक्षां यंदा जत्रा पुष्कळ असून पोलिसचा बंदोबस्त वगैरे उत्तम होता. जत्रेंत कोणी एक मनुष्य थंडीनें कांकडून मेल्याचें समजतें.

रा. रा. बापुराव भिकाजी हेड क्लार्क हे तीन महिन्यांचे रजेवर स्वदेशी परवा रोजी गेले.

व. मि.

---

## वर्तमानसार.

**याकुबखान** काबुलचा अमीर यास ता. १ डिसेंबर रोजीं पहाटें ६॥ वाजतां हिंदुस्थानांत पाठविण्यासाठीं मोठ्या बंदोबस्तानें काबुलाहून रवाना केलें. अधले दिवशीं रात्रौ ८ वाजतां त्यास ही गोष्ट कळविली. त्यानें आपला सासरा व दुसरे दोन सरदार कैदेंतून मोकळे करून बरोबर द्यावे अशी विनंती केली होती पण ती मान्य झाली नाहीं.

श्री. मल्हारराव गायकवाड हल्लीं मद्रासेस आहेत. त्यांनीं आपल्या खानगी खर्चाची व्यवस्था पहाण्याकरितां विलायेतहून एक बारिस्टर बोलाविले व ते त्याप्रमाणें हिंदुस्थानांत आले. व मद्रासेस जातांनां त्यांनीं श्री. मल्हारराव यांस भेटण्याकरितां हिंदुस्थान सरकारची मद्रासेच गवरनर साहेबास परवानगी आणिली होती व ती त्यांस दाखविली. मद्रासचे गवरनर साहेब ह्मणाले कीं ही गोष्ट आमचे अकत्यारांतील आहे व तुह्मास गायकवाडास भेटूं द्यावें असें आह्मांस वाटत नाहीं. सबब हिंदुस्थान सरकारची परवानगी आह्मी मानीत नाहीं. त्यावर बारिस्टर यांनीं पुन्हा हिंदुस्थान सरकारास लिहिलें त्यांकडून जबाब आला कीं या गोष्टीस आमचा उपाय नाहीं. मद्रासचे गवरनर साहेब या कामांत मुखत्यार आहेत.

नामदार चक्रवर्तिनी साहेबांची प्रकृति बिघडली होती आतां बरी आहे असें तारायंत्रांतून वर्तमान आलें आहे.

रशियाचे बादशहास पुन्हा ठार मारण्याचा कट झाला होता. ते आगगाडींतून मास्को शहरास जात होते त्या आगगाडीचे एके डब्यास कोणी आग लाविली. परमेश्वरानें खैर केली कीं बादशहाचे जिवास कांहीं धोका झाला नाहीं. कित्येक वेळां बादशहाचे जिवावर असे प्रसंग आले यावरून रशिया देशांतील स्थिति कशी आहे याचें अनुमान करावें.

ब्रिटिश सरकाराशीं एक निष्ठेनें वागणाऱ्या कित्येक नेटिव राजांस कांहीं बक्षिसें देण्याचा समारंभ सरकार लवकरच करणार आहे असें समजतें.

हिंदुस्थानांतून थेट काबूलपर्यंतची तारायंत्राच्या लायनीची गेल्या १९वे तारखेपासून सुरवात झाली असें कळतें.

उदेपूरच्या राजानीं संस्कृत भाषेंत सर्व राज्यप्रकरणीं काम चालावें ह्मणून हुकूम फरमाविला आहे असें कळतें.

अमीर यांस थोड्याच दिवसांत हिंदुस्थानांत यावें लागेल त्या वेळीं पलटणीची वगैरे सलामी देण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं असें कोणी ह्मणतात.

लार्ड लिटन हे परत विलायेतस जाणार अशी जी विलायेतहून तार आली होती ती अगदीं निराधार आहे असें पायेनियर पत्रकर्ता लिहितो.

आक्सफर्ड एथें नवीन स्थापन होणाऱ्या हिंदुस्थानांतील मुलांच्या विद्यालयाकरितां विजयानगर एथील महाराणींनीं १०००० रु. दिले असें कळतें.

कानपूर एथें तापानें दररोज सुमारें १५० लोक मरत आहेत यामुळें तिकडे लांकडें फार महाग झालीं आहेत. गिरण्यांतून लांकडांच्या ऐवजीं कोळसे जाळण्याचा प्रकार सुरू झाला आहे असें समजतें. ने. ओ.

---

## दंतशुद्धि.

दांत पांढरे शुभ्र आणि स्वच्छ असले ह्मणजे मुखवटा फार शोभिवंत दिसतो. आणि ते मजबुत असले ह्मणजे त्यांपासून कठिण पदार्थ चावून खातां येतो इतकेंच नव्हे तर त्यापासून पाचनक्रियेसही सहाय्य मिळतें. दांत पडल्यावर ह्मणजे बहुतकरून ह्मातारपणीं मनुष्यास या गोष्टीचा पुरा अनुभव येतो. दंतधावन योग्य रीतीनें केलें ह्मणजे दांत स्वच्छ होऊन त्यांस मजबुतीही येते. दांतांची घटणा क ी झाली आहे हें स्पष्ट लक्षांत आलें ह्मणजे दंतधावनासाठी कोणत्या पदार्थाची योजना करावी हें समजेल.

दांतांची संख्या बालपणीं ५० आणि तारूण्यांत ३२ असते. हे दांत जाभाडाच्या हाडांत बसविलेले असून त्यांस मानेपर्यंत हिरड्यांचें वेष्टन असतें. ह्मातार्‍या मनुष्याचे पडलेले दांत येतात, ते पाहिले तर पुढल्या दांतांस एक एक व मागल्यांस दोन दोन किंवा तीन तीन असे फाटे किंवा मुळें असतात. या दांतांतून प्रत्येकामध्यें तीन तीन भाग दृष्टोस पडतात. मुळाकडचा ह्मणजे हिरड्यांनीं वेष्टिलेला हा पहिला, मधला ज्या ठिकाणचा घेर कमी झालेला असतो तो दुसरा, आणि वरचा ह्मणजे खाण्याचा पदार्थ चाववण्याच्या कामीं जो भाग पडतो तो तिसरा, त्यांतून एकादा दांत उभा चिरून पाहिला तर त्यांत निरनिराळे तीन प्रकारचे भाग दिसतात. त्यांतून मधला भाग हस्ती दंतासारखा असून त्याच्या मुळाकडच्या भागाच्या सभोंवतीं हाडांचें वेष्टण असतें व तिसरा जो चावण्याचा भाग असतो त्यावर तिख्यासारख्या कठीण पदार्थाचें वेष्टण असतें. ह्या भागाच्या वरच्या बाजूस कठीण परंतु पातळ असें एक कवच असतें, यास दंतकवच असें ह्मटलें तरी चालेल. दंताच्या मुळाकडच्या भागांत एक लहान पोकळी असते व तिजमधून सुमारें $\frac{१}{५००}$ इंच व्यासाच्या बारीक नलिका निघून दाताच्या मधील भागांतून ह्मणजे वर सांगितलेल्या हस्तीदंतासारख्या दिसणाऱ्या भागामधून आरपार जातात. या पोकळींत व नळ्यांत अति सूक्ष्म मज्जातंतू व रक्तवाहिन्या शिरून दंतपोषण होतें. हे दांतांचे अवयव कसे बनले आहेत हे नीट ध्यानांत आणलें ह्मणजे दंतशुद्धी यथायोग्य न केल्यापासून अपाय काय घडतात हें स्पष्ट ध्यानां येईल. दंतधावनांत मुख्यत्वें दंतवेष्टण किंवा हिरड्या आणि दंतावयव यांच्या सुरक्षितपणाकडे लक्ष दिलें पाहिजे. दंतधावनाकरितां जें पाणी घ्यावयाचें त्यांत थोडी फटकीची पूड टांकून त्या पाण्यानें गुळणा करून टाकला असतां हिरड्यांस मजबुती येऊन; त्यांतून जर रक्त वाहात असलें तर तेंही बंद होईल. ह्याखेरीज दुसऱ्या औषधी पुष्कळ आहेत परंतु फटकी किंवा ज्यास तुरटी असें ह्मणतात ती बाजारांत प्रत्येक गांध्याच्या दुकानीं सांपडते ह्मणून तिचीच एथें योजना केली आहे. ही तुरटी हिरड्यांस मजबुती आणते इतकेंच नाहीं पण तोंडांतील सर्व त्वचा निरोगी करिते, ही पूड पाण्यांत जास्त घातली तर दांतास आंब चढेल ह्मणून ती जास्त घालूं नये. वर सांगितलेंच आहे कीं, दंतांच्या वरच्या ( चावण्याच्या ) भागावर एका कवचाचें वेष्टण आहे; तर दंतधावन करतेवेळीं ही त्वचा स्वच्छ राखिली पाहिजे आणि तीस इजा मुळींच होऊं देतां नये. पुष्कळ लोकांची समजूत अशी आहे कीं कठीण व जाड पदार्थांनीं दांत घासले असतां ते चकचकीत होतात व अशा समजुतीनेंच नदीतीरीं रहाणारे लोक नदींतील वाळू व चिखल यांनीं दांत घांसतात. कित्येक जाड राखुंडीनें घांसतात. तर अशा प्रकारच्या दंतधावनानें दांतांवरील पातळ त्वचा झिजून जाऊन आंतील नलिकांचीं अग्रें उघडीं पडतात, व तीं उघडीं पडल्यानें आंतील मज्जातंतूंस हवेचा किंवा खाण्याच्या पदार्थांचा स्पर्श झाला ह्मणजे अतिशय वेदना होऊं लागतात.

दांत न घातल्यापासून दांतांवर जी बुरशी चढते तिने दंतकवच कुजून केव्हां केव्हां दांत इतके झडून जातात कीं वरील सर्व दांत गळून जाऊन हिरड्यांतील दांतांचीं मुळें मात्र रहातात असें झाल्यामुळें जी वेदना व दुर्गंधी तोंडास सुटते ती सांगतां येत नाहीं. याचें कारण बारीक कीटक आपल्या घाणेरडेपणापुळें उत्पन्न होऊन ते बुरशी-तयार करितात आणि त्यांत आपलीं घरटीं करून ते दांतांचा नाश करितात. यापासून निरनिराळ्या दंतरोगांस सुरवात होते. दातांच्या फटींत अन्नादि पदार्थांचे कण अडकून राहिल्याने असेच अपाय होतात, तर हे सर्व टाळण्याकरितां दांतवणाची फार जरूरी आहे. दांतवण अशा प्रकारचें असावें कीं ज्यापासून दांतावरील त्वचा झिजून जाऊं नये, जमलेली बुरशी निघून जावी, दांतांवर होणाऱ्या कीटकांचा नाश व्हावा आणि दांत शुद्ध रहावे. दांतवण अतिशय जाड व खरखरीत असल्यानें दंतत्वचेचा नाश होतो असें वर सांगितलेंच आहे. तर कुठलाही पदार्थ घेतला तरी त्याची वस्त्रगाळ पूड करावी व ती लाळेमध्यें लवकर मिसळून जाईल अशी असावी. शुद्ध केलेला खडू ह्या कामास चांगला आणि दांतांतील सर्व ठिकाणची बुरशी घालवण्यास कुंच्या घ्यावा. कारण त्याचे केश दांतांच्या सर्व फटींत शिरून त्यांमध्यें मळ अगदीं राहूं देत नाहींत. कीटक मरून जाऊन दांतावर पुन्हा बुरशी न जमावी ह्मणून कापूर दांतवणांत घालावा. ह्याप्रमाणें कापूर आणि चाक यांचें दांतवण करून नित्य दंतशुद्धि केली तर वृद्धापकालपर्यंत दांत मजबूत राहतात. ज्यास इतकेंही उरकत नसेल त्यांनीं सुपारी जाळून त्याचा कोळसा करून त्याची वस्त्रगाळ पूड करावी, व त्यांत थोडा कापूर घालून त्याचें दांतवण करावें. आपल्या लोकांत दंतमंजनाचे अनेक प्रकार आहेत त्या सर्वांचें विवेचन एथें केल्यास विषय फार वाढेल; परंतु कोणत्याही प्रकारचें दांतवण असो त्यांत वर सांगितलेले चार गुण असले पाहिजेत, आणि ते नसले तर त्यापासून अपाय झाल्याशिवाय रहाणार नाहीं. दंतशुद्धि दांतांचें अतिशय रक्षण करते यांत तर मुळींच संशय नाहीं परंतु आपल्या दांतांत फार जोर आहे ह्मणून कठीण पदार्थ कडाकड फोडून दाखवणें, फार गरम पाणी अथवा बर्फ फार वेळ तोंडांत धरणें. यांपासून योग्य रीतीनें जरी दंतशुद्धी केली, तरी दांतांची आरोग्यता भंग झाल्याशिवाय रहाणार नाहीं. सु. प.

---

## जाहिरात.

### इंडियन पिनलकोड ह्म० सन १८६० चा आक्ट ४५ वा.

हायकोर्टाचे निवाडे व समजुतीच्या टिपासुद्धां.

सदर्हू आक्ट होऊन सुमारें १९ वर्षें झाली. या मुदतींत सदर्हू आक्ट सुधारण्याकरितां बरेच आक्ट पसार झाले आहेत व त्याचप्रमाणें सदर्हू आक्टावर मुंबई, मद्रास व कलकत्ता हाय कोर्टाचे ठरावही पुष्कळ झालेले असून ते सदर्हू आक्ट समजण्यास फारच उपयोगी आहेत. या सर्वांचा संग्रह एकत्र केला असतां त्यापासून लोकांची मोठी सोय होणार आहे. व शिवाय इंडियन पिनलकोडावर जी मेन साहेबानीं इंग्रजींत टीका केली आहे तशा प्रकारचा ग्रंथ मराठींत असावा अशी जी कित्येक लोकांचीं इच्छा आहे ती ही या ग्रंथापासून पुष्कळ अंशीं सफल होईल. या ग्रंथांत कोणकोणते विषय येतील, त्याची किंमत काय; व तो कधीं तयार होईल वगैरे बद्दलचा तपशील खालीं दिला आहे.

१ सन १८६० चा आक्ट ४५. २. हा आक्ट सुधारण्याकरितां त्याजपुढें झालेले आक्ट ३ सदर्हू आक्टांतील कलमावर १८७९ अखेरपर्यंत मुंबई, मद्रास व कलकत्ता हायकोर्टांनीं केलेले निवाडे व इंडियन ली रिपोर्ट सरू झाल्यापासून अलाहाबाद हायकोर्टानें केलेले निवाडे त्या त्या कलमा खालीं संक्षिप्त रीतीनें व समजण्याजोगे दाखल केले जातील. ४ त्या शिवाय कांहीं विशेष माहिती देणें जरूर दिसल्यास तीही दिली जाईल. ५. या ग्रंथाचा उपयोग २ रे व ३ रे वर्गाचे माजिस्त्रेटांस व्हावा ह्मणून यांत खालीं लिहिलेले आक्टही नीट सुधारून जोडले जातील, व त्या आक्टांवर झालेले हायकोर्टाचे ठरावही घेतले जातील.

१ सन १८६४ चा आक्ट ६ (फटके मारण्याचा) २. मुंबई सन १८६६ चा आक्ट ३ (जुगाराबद्दल.) ३ सन १८६७ आक्ट चा ७ ( डिस्ट्रिक्ट पोलिसाबद्दल ). ४. सन १८६७ चा आक्ट ८ गावचे पोलिसाद्दल. ) ५. सन १८७१ चा आक्ट १ (गुरांचे अतिक्रमणाबद्दल.) ६. सन १८७२ चा आक्ट ११ (परमुलखांतील अपराध्यांबद्दलचा.) ७. सन १८७४ चा आक्ट ९ (युरोपियन वेग्रन्सी आक्ट.)

सदर्हू ग्रंथ टायपावर व चांगल्या कागदांवर छापला जाईल. ह्या ग्रंथाची किंमत आगाऊ रु० ५ व टपाल व बंगी खर्चाबद्दल ८६ आणे ठेविली आहे. ही किंमत ता. ३१ माहे डिसेंबर सन १८७९ चे आंत आमच्या आफिसांत भरावी. या मुदतीपुढें ज्यास्त किंमत पडेल. सदर्हू ग्रंथ माहे जानेवारी सन १८८० अखेर तयार होऊन लोकांस देण्यांत येईल.

किमतीबद्दल पैसे पाठविणें ते रोख किंवा पुण्याची दर्शनी हुंडी किंवा मनीआर्डर अगर नोट या रूपानें पाठवावेत.

पोस्टाचीं टिकिटें पाठविणें झाल्यास तीं अर्धा आणा दराचीं असून तीं दर रुपयास ८१ आणा- वर्तवळ्या प्रमाणें पाठवावींत. अर्धा आण्याहून जास्त दराचीं आल्यास तीं घेतलीं जाणार नाहींत.

कोर्ट फीचीं टिकिटें मुळींच घेतलीं जाणार नाहींत.

पुणें—न्यायाश्रय आफिस. } त्रिंबकराव नारायण.
पेठ शनिवार, भेहुणपुरा. } शिवराम हरी साठे.

तारीख १ नोवेंबर

---

## जाहिरात.

### हिंदुस्थानचें भूगोलपत्रक.

हें उत्तम खिळे छापावर छापून विक्रीस तयार आहे. मराठी चवथी इयत्ता शिकणारे मुलांस ह्या पत्रकावरून हिंदुस्थानच्या भूगोलाची माहिती अल्प श्रमानें होऊन नकाशा पाहण्यासही फार सुलभ पडेल. हिंदुस्थानच्या नवीन भूगोलांत असलेल्या सर्व प्रकारच्या माहितीचा समावेश ह्यां पत्रकांत झालेला आहे. किंमत दर प्रतीस पाऊण आणा, व ट० हां० बारा प्रतींपर्यंत अर्धा आणा पडेल. बारा प्रती एकदम घेतल्यास ट०हा० पडणार नाहीं.

भास्कर बल्लाळ आपटे.
स्कू० मा० पिंप्राळें, ता० जळगांव
जि० खानदेश.

---

## मुंबई ब्यांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शेकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास ( ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरची किंवा मुद्दाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजनें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.
तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला, रविवार ता० २१ माहे डिसेंबर सन १८७९ इसवी. अंक ४९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## मुंबई बयांक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर.

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शकडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास (ह्मणजे तारीख १ नोवेंबर पासूनता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें. सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरची किंवा मुद्दाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## कौमुदीमहोत्साहः

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकाम, ध्यें "सिद्धांत कौमुदी" संस्कृत व्याकरण-आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षडलिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें-किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प-ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च माहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस "पोष्टपेड" पत्रीं कळवावें ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर

कौमुदीमहोत्साहकर्ते.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८

## नादारी प्रकरणीं नियम.

वऱ्हाडांत नादारी संबंधी जो कायदा हल्लीं चालू आहे व ज्याच्या प्रति मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं सरकारी कचेऱ्यांतून वहिवाटीकरितां छापवून दिल्या आहेत तीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत आठ आणे. बाहेरगावी पाठविण्यास एक आणा अधिक लागेल.

## नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें.

वऱ्हाडाकरितां अलीशान रेसिडेंट साहेबांनीं तयार करून रेसिडेन्सी आर्डरमध्यें जीं नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें छापून प्रसिद्ध केलीं व ज्यांचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं छापवून कोर्टानिहाय दिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत सहा आणे. बाहेर गावीं एक आणा अधिक पडेल.

## महामारी.

हा भयंकर रोग सर्वत्र प्रसिद्ध आहे त्याविषयीं चांगली माहिती होणें व त्यावर वक्तशीर उपाय योजणें फार अवश्यक आहे. ह्मणून मिरज संस्थानचे मेडिकल आफिसर रा. रा. त्रिंबक सखाराम सिरवलकर एल. एम. यांनीं या विषयावर एक लहानसें उत्तम पुस्तक तयार केलेलें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहे. किंमत सहा आणे. बाहेर गावीं नेणारास एक आणा अधिक पडेल.

## कृषिकर्मविद्या अथवा शेतीचें वर्णन.

हा सुमार साडेपांचशें पृष्ठांचा मराठी ग्रंथ ग्रंथोत्तेजक मंडळीकडून नुकताच छापून तयार झालेला प्रसिद्धीस आलेला आहे. हा विषय मोठ्या महत्वाचा असून ग्रंथांतील माहिती फार शोधकपणानें लिहिलेली आहे. याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. किंमत ३॥ रुपये व डांकहशील ०४

## COMEDY OF ERRORS.
## कामडी आफ एरर्स.
अथवा
## भ्रांतिकृतचमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरलेला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे. असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें किंमत ०६ आणे.

हें औषध गजकरण शिवायकरून खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वीं आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यांपासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत. तारीख १० माहे आक्टोबर सन १८७८ इसवी.

## सुबोधसार
भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञान व विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समय विशेषीं कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे ग्रंथ जाड कागदावर खिळे छापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०१० आणे टपाल खर्च ००६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक तावडतोब रवाना केलें जाईल. कळावें. ता. २६ अक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नोटिस.

रा. मानाजी वलद इष्णाजी तेली राहणार मोरगाव सादेजन तालुके बाळापुर जिल्हा अकोला यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे जवळ आमचें तेल धडी १ एक अनामत ठेविलें असून त्याजला अजमासें दोन वर्षें झालीं आह्मीं तुह्मांस पांच चार वेळां तगादा ही केला, परंतु दिलें नाहीं. आणि जबाब देता कीं, आमचें जवळ तुमचें तेल ठेविलें नसून निवाजी माळी राहणार किन्ही तालुके खामगाव जिल्हा बुल्ढाणा याणें ठेविलें आहे. त्यानें मागितलें असतां आह्मी ते तेल त्यास देऊ. त्याजवरून त्या सदर्हू माळ्याचें तेल ठेविल्याबद्दलचें पत्र आपणास आणून दिलें तरी तें पत्र तुह्मी अमान्य केलें करितां आपणास ही नोटिस दिली आहे तरी ही नोटिस पावल्या पासून ८ आठ दिवसांचें आंत तेल व या नोटिशीस लागलेला खर्च वरील मुदतीचें आंत दावा न दिल्यास कायदेशीर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून तेलाची किंमत व नोटिसीचा खर्च आणि फिर्यादीस लागेल तो खर्च भरून दावा लागेल.

कळावें तारीख १२ माहे दिसेंबर सन १८७९ इसवी.

( सही ) माहादाजी वलद गोमाजी अज्ञान पालन कर्ता सोनाजी वलद कृष्णाजी माळी वस्ती मोरगाव सादिजन दस्तूर खुद.

## वसूल.

| | रुपये |
|---|---|
| श्रीमती लक्ष्मी बाई देशमुखीण | ७ |
| रा. रा. दिनानाथ गोपाळ साहू | १३ |
| रा. रा. झामासिंगजी चीफ कान. | ६०८ |
| ,, ,, गोविंद राघु खसाळे | १०८ |
| ,, ,, कृष्णाजी नारायण मुळे | २०१२ |
| ,, ,, तुकाराम बाळू साकिनगेगेझरी | ३ |
| ,, ,, सेक्रटरी ने. ला. पांढरकवडा | ६०८ |
| " " नारायणराव दीपचंद | २७०६०६ |
| ,, ,, व्यंकटराव हणमंतराव | ३०४ |
| मि. लाटण साहेब डि. क. | ५ |
| रा. रा. आत्माराम पाटील | ३८ |
| ,, ,, गुलाबराव लालचंद साहू | ६०८ |
| ,, ,, बाबुसिंग रामसिंग | २२०५ |
| ,, ,, केशव विनायक वकील | ७६ |
| अलिशान रेसिडेंट साहेब बहादुर | ३६ |
| रा. रा. देवराव जयराम बांड | ६०७ |
| ,, ,, सखाराम विठ्ठल नाझर | ३०४ |
| ,, ,, काळजी वलद जयमल पा. | ६०८ |
| ,, ,, भवानी वलद धुळाजी पा. | ६०८ |
| ,, ,, मोतिलाल जयगोपाळ साहू | १२ |
| ,, ,, सदाशीव नारायण वकील | २५ |
| ,, ,, बलदेवसिंव्ह पो. इ. | २५ |
| ,, ,, माधवराव रामचंद्र वकील | ११ |
| ,, ,. विश्वास टिकाराम पाटील | ६०८ |
| ,, ,, शिवबकस पन्नालालजी | ६०८ |
| ,' ,, अमृतराव विनायक देशमुख | १६०४ |
| ,, ,, विष्णु मोरेश्वर मास्तर देऊळगाव | ७ |

*** सन १८७९ साल पुरें होत आलें सबब या सालची व मागील सालची वर्गणी ज्याजकडे येणें आहे ती त्यांनीं कृपाकरून लवकर पाठवावी.

वऱ्हाडसमाचार.

मिति मार्गशीर्ष शुद्ध ८ शके १८०१

## अकोल्यास रेसिडेंट साहेबांकरितां समारंभ.

हैदराबादचे रेसिडेंट अलीशान सर रिचर्ड मीड साहेब के सी एस आय यांची स्वारी गेले सोमवारीं पाहाटेच्या गाडीनें एथें आली. बुधवारीं दरबार झाला, गुरुवारीं स्वारी खामगावास जाऊन शुक्रवारीं परत आली व उद्या यवतमाळाकडे जाणार. या वेळीं अकोल्याच्या लोकांनीं जें मनःपूर्वक साहेब बहादुरांचें आदरातिथ्य केलें व जी शहरशोभा केली ती फारच वर्णनीय होती यांत संशय नाहीं. टौनहाल स्वच्छ करुन, रंगवून जागोजागीं निशाणें लावून व चिराकदान लावून तो फारच मनोहर केला होता पुलावर एक व मार्केटांत एक अशा दोन भव्य कमानी उभ्या केल्या होत्या व त्यांवर सोनेरी अक्षरांनीं रेसिडेंट साहेबांचें स्वागत दर्शविलें होतें. जिकडे तिकडे स्वच्छता व चकचकाट होता; टौनहालांत तर बुधवारीं दोन प्रहरपासून रात्रौ आठ वाजेतोंपर्यंत रंगदेवतेनें केवळ ठाणच मांडलें होतें. पश्चिम वऱ्हाडांतील नवाब बहुतेक राजे, जहागिरदार, इनामदार, काजी, मौलवी, देशमुख, देशपांडे, सावकार, सरकारी मोठमोठे कामदार व इतर सभ्य गृहस्थ यांनीं दिवाणखाणा दणाणून गेला होता. नंतर युरोपियन अधिकारी व त्यांच्या स्त्रियाही आल्या कांटिंजेंट पलटणीचे लोक व व्हालंटियरचे लोक कारंजापुढें हारीनें उभे होते व त्यांचा फेर फटका होत होता. मग बरोबर ४ वाजतां अलीशान रेसिडेंट साहेबांची स्वारी आली. त्यांनां व उभयतां कामिशनर साहेबांनां बसावयाकरितां तीन खुर्चापुरतें सिंव्हासन केलें होतें त्यावर ते विराजमान झाले. रेसिडेंट साहेबांचे उजवे बाजूस कमिशनर साहेब व डावे बाजूस जुडिशियल कामिशनर सा. बसले होते. दरबारास सुरवात होतांच मे. ट्रेंव्हर साहेब यांनीं दस्तुर बहिमनजी साहेबाकरितां आणिलेलें कंप्यानिपनच्या किताबाचें सुवर्ण पदक रेसिडेंट साहेबांचे हातीं दिलें. व ते त्यांनीं बहिमनजी साहेबास आपले पुढें बोलावून आपण उभे राहून स्वहस्तानें त्यांच्या अंगरख्याच्या डाव्या भागावर बसवून दिलें. व नंतर संभाषण केलें व त्यावर द. बहिमनजी साहेबानीं समर्पक उत्तर दिलें. नंतर दरबारच्या लोकांच्या भेटी झाल्या. मग रेसिडेंट साहेबानीं उभे राहून इंग्लिश भाषेंत उत्तम भाषण केलें व त्याचें भषांतर रा. रा. विष्णु सदाशिव पिसोळकर याजकडून सर्वांस सांगितलें. नंतर पान सुपारी अत्तर गुलाब होऊन दरबार बरखास झालें.

रेसिडेंट साहेब दरबारांतून परत जाऊन एक तासानें ह्मणजे सात वाजण्याचे सुमारास म्युनिसिप्यालिटीच्या पानसुपारीच्या समारंभास टौनहालांत परत आले. त्यावेळीं ताजना पेठेंत मार्केट गंजांत उत्तम प्रकारची रोषनाई केली होती ती पाहात पाहात संतोषानें स्वारी टौनहालावर आली. त्यावेळीं तेथें सर्व इमल्यावरुन हजारो दिवे लावून मोठा चकचकाट केला होता. दिवाणखान्यांत हंड्या व मूनलाईट लाविले होते. साऱ्या कंपौंडांत कंदील लाविले होते, व कंपौंडाच्या सभोवार हारीनें दिवे लाविले होते, ती उत्तम शोभा पाहून रेसिडेंट साहेबांचे मनास फार समाधान वाटलें. सभास्थानीं स्वारी विराजमान झाल्यावर त्यांचे गळ्यांत हार घातला व पानसुपारी अत्तर गुलाब दिलें. नंतर रा. रा. श्रीराम भिकाजी जटार म्युनिसिपल मेंबर यांनीं साहेब बहादुरांचे आभारप्रदर्शक भाषण केलें, नंतर तेथून स्वारी निघून पुलावरुन गावचे चौकांतून हवाखान्याकडे जाऊन परत गेली. सायंकाळपर्यंत मंडळी दरबाराकडे गुंतली असल्यामुळें व रेसिडेंट साहेबांची स्वारी लवकर आल्यामुळें गावांत तयार करून ठेवलेलीं चिराकदानें सर्व लावितां आलीं नाहींत. गावांत सडकेच्या दोन्हीं बाजूस बास लावून त्यांवर, पुलावर व किल्यावर मिळून सुमारें ६००० हजार दिवे ठेविले होते व त्यांकरितां चार व्यापाऱ्यांनीं २४ मण तेल दिलें होतें. पण त्यांच्या हौसेप्रमाणें सर्व दिवे यथास्थितपणें लागते तर त्यांस फार संतोष झाला असता. असो. रेसिडेंट साहेबानीं ग्रामस्थांचा आदर करून आपला संतोष दाखविला व परत गेले. गावचे चौकांत मोठा मंडप घालून तेथें रेसिडेंट साहेबांस विड्यास बोलवावें असा मंडळीचा बेत होता पण त्यास मान्यता मिळाली नाहीं ह्मणून मांडव तयार मात्र झाला. त्यांत हौसेप्रमाणें रोषनाई व बैठकांचा थाट झाला नाहीं. याप्रमाणें बुधवारची हकीकत झाली.

रेसिडेंट साहेब हायस्कूल पहाण्यास एक दिवस गेले होते व एक दिवस गाव पहाण्यास आले होते. हायस्कुलांतील कसरत पाहून त्यांनीं २५ रुपये दिले व बेडर लोकांच्या मुलांच्या शाळेला २० रुपये दिले.

टौनहालांत शोभा व बातबेत ठेवण्याचे कामीं दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांनीं दोन आठवडे अतिपरिश्रम केले. व त्यांस मि० शापुरजी शेट नाजर, रा. रा. गोपाळराव भिडे, व रा. रा. कृष्णराव हरी कोलटकर यांनीं उत्तम सहाय दिलें. गावांत व पेठेंत देखावा चांगला करण्याचे कामीं रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान, रा. रा. देवराव विनायक वकील, रा. रा. पांडुरंग गोविंद वकील, रा. रा. सदाशिव विष्णु भागवत, रा. रा. विष्णु आत्माराम मास्तर, मि. कादरभाई, मि. सिलीमखा, व मि. जोरावरखा यांनीं फार खटपट केली व त्याबद्दल सर्व गावाच्यॉं वतीनें आह्मी सदरील सर्व गृहस्थांचे आभार मानितों.

---

## दरबारांतील भाषणें

अलीशान रेसिडेंट साहेब यांनीं मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. यांनां सुवर्ण पदकानें भूषविलें त्या प्रसंगी अशा अर्थाचें भाषण केलें:—

दस्तुर बहिमनजी साहेब, आपण बंडाचे वेळीं फार उत्तम कामें करून सरकारास सहाय केलें. तसेंच नोकरीस लागल्या पासून आज दिवसपर्यंत सरकारी कामें आपण फार दक्षतेनें करीत आला; यास्तव चक्रवर्तिनी साहेबांनीं संतुष्ट होऊन आपणास "कंप्यानियन आफ धि इंडियन एंपायर" ही महत्वाची पदवी दिली आहे तिचें पदक आपणास देण्याचा हा समारंभ माझे हातून घडला याबद्दल मला फार उल्हास वाटतो. आपले कामाची आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून वारंवार शिफारस होते व आह्मी आपलीं कामें पहातों त्यावरून आह्मांसही फार संतोष वाटतो. आतां या पदवीचा आपण दीर्घकाल उपभोग घ्यावा. व आपले हातून अशींच आणखी मोठमोठालीं कामें व्हावींत असें आह्मी इच्छितों.

मे० दस्तूर बहिमनजी साहेब यांनीं फार नम्रपणानें व हलक्या स्वरानें त्यावर उत्तर दिले तें अशा अर्थाचे होतें:—

मी आजपर्यंत जें कांहीं केलें तें सरकारी नोकरीच्या संबंधानें जें माझें कर्तव्य तेंच केलें. त्याचें एवढें स्वरूप व्हावें व चक्रवर्तिनी साहेबानीं मला उत्तम पदवीनें भूषवावें अशी माझी कल्पना नव्हती, माझ्यावरील अधिकाऱ्यांचें व आपलें मजवरील प्रेम दृढतर असल्यामुळें माझी अल्प स्वल्प कामगिरी आपल्या थोर मनानें आपणास मोठी वाटून आपण हिंदुस्थान सरकार मार्फत चक्रवर्तिनी साहेबापर्यंत तीनेऊन त्यांकडून या पदवीनें मला गौरविलें याजबद्दल मी चक्रवर्तिनी साहेबांचे, आपले, व इकडील सरदारांचे उपकार मानितों. परमेश्वर मजकडून अशीच निरंतर सेवा घेवो व अल्पसेवा कां होईना ती झटून मनःपूर्वक केल्यानें तिचें इतकें चांगलें चीज होतें हें माझे इतर बंधुजनास कळून त्यांकडून अशीच कामें होवोत, त्यांचा सरकारांत गौरव होवो व त्यांस अशाच पदव्या मिळोत असें मी इच्छितों.

रेसिडेंट साहेब दरबाराचे शेवटीं बोलले त्यांतील मतलब असा:—

या प्रांताची साल मजकुरची पिकापाण्याची स्थिति चांगली आहे हें पाहून आह्मांस संतोष होतो. गुदस्त सालची वऱ्हाडची स्थिति चांगली नव्हती. हवेचा उपद्रव होऊन त्यानें मोठा कहर केला व पुष्कळ लोक मरण पावले त्याबद्दल आह्मांस दुःख वाटलें. शाळा खात्याची स्थिति फार चांगली आहे व इकडील स्थाईक देशमुख, देशपांडे वगैरे यांस विद्येचें मोल समजून ते आपलीं मुलें शाळांतून पाठवू लागले आहेत ही संतोषाची गोष्ट होय. सरकार आतां बाहेरच्या लोकांस जागा देण्यापेक्षां इकडील लोकांस विशेष देईल. त्यांतून जमीदार लोकांचीं मुलें चांगलीं तयार झालीं ह्मणजे त्यांस अवश्यमेव सरकारी जागा मिळतील. एक गोष्ट आह्मांस दिलगिरीची वाटते कीं, वऱ्हाडांतील मुसलमान लोकांचा समूह विद्येच्या कामीं द्यावें तितकें लक्ष्य देत नाहीं. ही उणीव त्या ज्ञातींतील प्रमुख व वजनदार गृहस्थांनीं काढून टाकावी. व त्यांचीं मुलें विद्वान होतील असें करावें. सरकार कोणत्या जातीविषयीं कांहीं अधिक उणें न पहातां समतेनें वऱ्हाडांतील लोकांस जागा देईल. मे० दस्तुर बहिमनजी साहेब यांनां चक्रवर्तिनी साहेबानीं जी महत् पदवी दिली ती त्यांच्या उत्तम कामाबद्दल व सद्गुणाबद्दल आहे व ती आमचे हातून आह्मांस देतां आली याजबद्दल आह्मास संतोष वाटला. आह्मी त्यांस चांगलें जाणतों. व इच्छा करितों कीं दुसरे कामदार लोकांनीं सरकारी व लोकहिताचीं कामें अशींच झटून करावीं ह्मणजे तेही पदवीस चढून त्यांचा गौरव होईल. वऱ्हाडास प्रस्तुतचे कमिशनर व व जुडिशियल कामिशनर आहेत ते फार चांगले आहेत. व खालीलही अधिकारी चांगले आहेत व रयत लोकांचें त्यांवर चांगलें प्रेम आहे ही गोष्ट वाखाणण्याजोगी आहे. मागील खेपेस आह्मी अकोलें शहर पाहिलें त्यापेक्षां या शहराची सुधारणा आतां चांगली झाली आहे. बाजाराकरितां जागा चांगली होऊन तेथें दुकानें सुरेख झालीं आहेत. कापसाचीं यंत्रें एथें आलीं आहेत, दुसऱ्या किखेक गोष्टी झाल्या आहेत व म्युनिसिप्यालिटी शहर सुधारणेकडे चांगले लक्ष्य देत आहे असें समजून आलें आहे. हलीं छावणीची हद्द म्युनिसिप्यालिटीस मिळाली असल्यानें तिचें उत्पन्न जास्ती होऊन तिला अधिकाधिक सुधारणा करण्यास सांपडतील व ती त्या करील अशी आह्मीं उमेद बाळगतों. आजचा दरबारचा समारंभ चांगला झाला व एथें आणि गावांत ठिकठिकाणीं चिराकदानें आणि शोभा करून सर्वांनीं आपला संतोष व उत्साह दर्शविला; सबब त्या लोकांचे, म्युनिसिप्यालिटीचे, आणि तिचे व्हाइस प्रेसिडेंट दस्तूर बहिमनजी साहेब यांचे आह्मीं आभार मानितों. आह्मीं मागें वऱ्हाडांत आलों होतों, हलीं आलों आहो, आणि पुढेंही वारंवार यावें अशी आह्मास हौस आहे सबब त्या त्या त्यावेळीं वऱ्हाडचे लोकांत सुधारणा, संतोष, आणि शांति अधिकाधिक आहे असें पाहण्यानें आह्मा फार खुष होऊ असें आमचें आपणा सर्वांस सांगणें आहे.

---

## काबुलाकडे पुन्हा गडबड.

हें काबूलप्रकरण सुरू झालेलें केव्हां निकालास लागेल तें लागो. शहर हस्तगत झाल्यावर प्रांतांत बंदोबस्तांचे काम सुरू झालें होतें, जागोजाग इंग्लिश फौजांचे तळ पडले होते व तारायंत्रानें बातम्या जाणें येणें सुरू झालें होतें. पण काबुली लोकांनीं व तिकडील काबुली फौजेनें पुन्हा उचल केली आहे. गेल्या १२ वे, १३ वे व १४ वे तारखेस लढाया झाल्या, त्या वेळेस शत्रूंचा जमाव वीस हजारांपासून तीस हजारांपर्यंत होता. ते मोठ्या निकरानें लढले. सरकारची एक तोफ त्यांनीं घेतली. सरकारचे १८ लोक मेले व २५ जखमी झाले. आफिसर थोडे मेले आणि जखमी झाले. तारायंत्राची नला लाबादजवळ शत्रूंनीं तोडातोड केली आहे. जनरल राबर्ट साहेबास आणखी हिंदुस्थानांतून फौज नेण्याचें अगत्य वाटत आहे काबुली लोक इतके पिसाळले आहेत कीं लढाईत जखमी झालेल्या लोकांवरही हल्ला करून त्यांस ठार मारतात. इंग्लिशाकडे ज्याचें अंग होतें तो अयूबखान त्यांनीं कैद केला व त्याला ठार मारिलें. याप्रमाणें ते लोक पुन्हा बिथरले आहेत. यावरून आणखी कांहीं लढाया व रक्तपात होतील असें दिसत आहे. एकंदरींत अफगाणिस्थानचा परिणाम चांगला होत नाहीं हें खचीत आहे. व ते अशी त्रासदायक कृत्यें करूं लागले ह्मणजे इकडून आणखी फौज जाणार व लढाईस खर्च जास्ती लागून त्याचा बोजा हिंदुस्थानावर पडणार. मर्जी देवाची !

सोन्याच्या खाणी— म्हैसुराकडे वैनादच्या लगत्यास सोनें सापडतें या गोष्टीकडे

विलायतेतील पुष्कळ लोकांचें लक्ष लागलें आहे. व त्याची खटपट करून अजमासही पहाण्यांत आला आहे. मागें एक दोन कंपन्या उभारल्या होत्या व हल्लींही नुकतीच एक दहा लक्ष रुपये भांडवल जमवून विलायतेस वैनादच्या खाणींतून सोनें काढण्याचे कामाकरितां एक कंपनी तयार झाली आहे, असें तिकडील वर्तमानावरून समजतें. आमचे लोकांस शहाणपण नाहीं, व साधनें नाहींत त्यामुळें आमची कशी निकृष्ठ स्थिति झाली आहे ती पहा ! आमच्या देशच्या जमीनींतिल सोनें परक्या राष्ट्रांतील लोक येऊन खणून घेऊन जाणार व आह्मी त्यांचे हाताखालीं खोऱ्या कुदळींनीं मजुरी करून रोज तीन आण्याचे पैसे कमाविणार! धन्य आमची! इतकें शहाणपण व इतकीं साधनें आमच्या लोकांस परमेश्वर केव्हां देईल तीं देवो!

---

**लार्ड लिटनवर शस्त्र**— जार्ज्य डिसा नावाच्या एका बरतर्फ झालेल्या युरेशियनानें लार्ड लिटन साहेब व्हाइसराय हे हावऱ्याचे रेल्वे स्टेशनावरून कलकत्यास जात असतां मंडळीच्या गर्दीतून पुढें येऊन त्यांच्या गाडीवर नेम धरून पिस्तुलाचे दोन आवाज काढिले. व त्यांच्या पाठीमागून चालल्लेल्या गाडीवरही एक पिस्तुल झाडेंल. त्यास लागलीच पकडलें. त्या वेळीं तो दारू पिऊन गुंग झालेला होता. दुसरे दिवशीं माजिस्त्रेटपुढें त्याची जबानी झाल्यांत मला कांहीं ठाऊक नाहीं असें तो ह्मणाला. माझ्या हातांत पिस्तुल होतें कदाचित आवाज झाला असेल. मी तें पिस्तुल नीट करावयास कारागिराकडे घेऊन जात होतो. सदर्हू मनुष्य वेडा असावा असाही संशय आहे सबब डाक्टरकडून परीक्षा होण्यावर त्याचा मुकद्दमा तकूब आहे. वेडे किंवा अविचारी मनुष्य कोणे प्रसंगीं काय करून आपला नाश करून घेतील याचा नेम नाहीं. हें वर्तमान ऐकतांच महाराणी साहेबाकडून दुःखप्रदर्शक तार व्हाइसराय साहेबांस आली.

---

**सर गार्बर्ट साहेब**— काबुलचे सेनापति पुढील सालाच्या आरंभींच विलायेतस जातील. तेथेंच के. सी. एस. आय. चा किताब त्यांस देणार आहेत. हें त्यांच्या कर्तृत्वास योग्य भूषण होय.

---

**आर्मी कमिशन**— हिंदुस्थानांतील सैन्य खात्याच्या खर्चाबद्दल व व्यवस्थेबद्दल विचार करण्यासाठीं सरकारानें नुकतेंच एक आर्मी कमिशन नेमिलें होतें त्या कमिशनानें आपलें काम पुरें करून सरकारास रिपोर्ट केल्याबद्दल खबर आली आहे. त्यानीं बारमिनिस्टरची जागा कायम ठेविली, मुंबई व मद्रास एथील सैन्याचे वेगवेगळे अधिकार कमी केले व हिंदुस्थानच्या सर्व सैन्याचे ४ विभाग केले. १ बंगाला आणि वायव्य प्रांत, त्यांचें ठाणें अलाहाबादेस किंवा लखनौस, दुसरा भाग पंजाब, त्यांचें ठाणें रावलपिंडीस, तिसरा भाग मुंबई सिंध सुद्धां, ठाणें पुण्यास, व चवथा भाग मद्रास ब्रह्मदेशासुद्धा, व त्यांचें ठाणें बंगलुरास करावें असा त्यानीं अभिप्राय दिला आहे.

---

चक्रवर्तिनी साहेब आजारी झाल्या होत्या तेव्हां काशीचे महाराजानीं तारायंत्रांतून त्यांच्या प्रकृतीविषयीं विचारपूस केली त्यांस प्रिन्स आफ वेल्स यांनीं जबाब पाठविला कीं, चक्रवर्तिनी साहेबांची तबेत दुरुस्त आहे.

---

**डावरे याचा मृत्यू**—खोट्या नोटा करणारा प्रसिद्ध गोविंद नारायण डावरे यःला थोड्या दिवसां पूर्वीं त्याचे घरीं मुद्देमालानिशी मे० गनत्राप साहेब आमचे पोलिस सुप्रिंटेंडेंट यांनीं पकडल्याचे आमचे वाचकांस ठाऊक आहेच. त्यावर खटला सुरू होऊन त्याच्या अनेक लबाड्या उघडीस येतील व त्याचे साथीदार पुष्कळ लोक धरले जातील असें वाटलें होतें. पण तो ग्रंथ संपला. डावरे मजकूर कैदेंत असतां विडी ओढीत होता. त्या विडीचा गूल त्याचे कपड्यावर पडून ते पेटले. व पुष्कळ कपडे अंगावर असून ते दाटेक असल्यामुळें लवकर निघाले नाहींत. त्यामुळें त्याचें आंग फार जळालें व त्याला इस्पितळांत नेला असतां त्या वेदनेनेंच दुसरे दिवशीं तो मरण पावला असें वर्तमान आलें आहे. कोणी ह्मणतात यांत कांहीं लबाडी असावी. त्याजपासून खोट्या कर्मानीं फायदा करून घेणारे लोकांनीं कांहीं फंद करून तो मरावा अशी तजवीज केली. असेल वहिमावरून शिपाइ वगैरे धरिले आहेत. पुढें काय निष्पन्न होतें पाहावें.

---

## वऱ्हाड.

---

अलीशान रेसिडेंट साहेबांची स्वारी उद्याच्यां पाहाटच्या गाडिनें यवतमाळाकडे जाणार व तेथून २४ वे तारखेस उमरावतीस येणार. उमरावतीचा दरबार जानेवारीचे पहिले तारखेस होणार. नंतर साहेब बाहादूर इलिचपुराकडे जातील. खामगावास स्वारी गेली होती ती जनुनें येथें जो मोठा तलाव होणार आहे तो पाहण्यास गेली होती. व तेथेंही मि० डनलप साहेब, तहसिलदार रा. रा. भास्कर महेश्वर यांनीं मोठी खटपट करून दरबारचा थाट चांगला केला होता. व भास्करराव दरबाराकरितां अकोल्यास आलेले खामगावीं स्वारी जाणार ह्मणून दरबार होईपर्यंत न थांबतां बुधवारीं दुपारेच गाडीनें खामगावास परत गेलें.

---

मि० जोन्स साहेब कमिशनर रेसिडेंट साहेबांबरोबर खामगावास गेले होते. पण त्यांबरोबर परत न येतां शिगावास उतरले व परभारें उमरावतीकडे तयारीसाटीं गेले असें समजतें.

---

क. बुशबी साहेब बुलढाण्याचे डिपुटीकमिशनर दरबारास आले होते ते खामगावास रेसिडेंट साहेबांबरोबर जाऊन तिकडून आपले जिल्ह्यांत परत गेले.

---

मे. ग्रांट साहेब असिस्टंट कमिशनर विलायतेचे रजेवरून परत आले.

---

पुण्यास इंजिनियरिंग काॅलेजांत असेले वऱ्हाडांतील विद्यार्थी रा. रा. मार्तंड वामन भवाळकर व रा. रा. गोपाळ बाळकृष्ण हे या वर्षांच्या एफ सीच्या परीक्षेत पास झाले.

---

उमरावतीस वक्तृत्व समारंभ २९ वे तारखेस गुरुवारीं सुरू होणार आहे. हा समारंभ, नंतर रेसिडेंट साहेबांचा दरबार मिळून तेथें ८।१० दिवस मोठा थाट होईल. रा. ब. डायरेक्टर साहेब व आणखी कांहीं मंडळी उमरावतीस जाणार आहे.

---

मूर्तिजापुरचे मास्तर रा. रा. वामन जिवनराव यांनीं आपले एथील शाळा चांगली सुधारली व फार झटून मुलांस विद्यादान दिलें हें पाहून ग्रामस्थांनीं खुष होऊन १९ रुपयांचें एक घड्याळ त्यांस बक्षीस देण्याकरितां विनंतीपत्रासोबत उमरावतीचे डिपुटी कमिशनर साहेबाकडे पाठविलें आहे असें कळतें. यावरून आह्मास संतोष वाटतो व वामनराव यांचे हुशारीस आणि ग्रामस्थांचे कृतज्ञतेस आह्मी चाहतो.

---

पुणेंकर कालिदास नाटककार मंडळी नागपुराकडून उमरावतीस आलेली आहे. व ती ८।४ दिवसांत एथें येणार आहे. तिचे प्रमुख या आठवड्यांत एक दिवस एथें आले होते. ७।८ महिन्यामागें सांगलीकर नाटककार एथें असतां ही मंडळी ५।६ दिवस एथे आली होती व गडबडीनें ३ खेळ करून पुढें गेली. त्यांची लोकांस आठवण असेल. त्यांच्या नाटकांत कित्येक स्त्रिया आहेत, व इतर देखावे व पडदे फार चांगले आहेत. व खेळही बरेच सुधारले आहेत. असें कोणकोणाचे सांगण्यांस आलें. तेव्हां ही मंडळी महिना दीड महिना एथें राहून लोकांचें चांगलें मनरंजन करील असें वाटतें. कादरभाईचें नाटकगृह त्यानीं ठरवून घेतलें आहे.

---

मुंबईच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेचा निकाल समजला. उमरावती हायस्कुलांतून ७ विद्यार्थी गेले होते त्यांतून ६ पास झाले हें ऐकून आह्मांस फार संतोष वाटतो. व रा. रा. विष्णू मोरेश्वर महाजनी एम ए तेथील हेडमास्तर व त्यांचा स्टाफ यांची आह्मी तारीफ करितों. अकोला हायस्कुलांतून ४ विद्यार्थी गेले होते पण दुर्दैवानें त्यांतून एकही पास झाला नाहीं या बद्दल आंह्मास दुःख वाटतें. आलीकडे उमरावती हायस्कूल तजेल्यास येत असून अकोला हायस्कूल घसरत चाललें आहे असें होणें चांगलें नाहीं. पगारानें व योग्यतेनें सरकारानें अकोल्याचें हायस्कूल वरच्या पायरीचें ठेविलेलें आहे असें असतां त्याची अशी दुर्दशा होणें ही गोष्ट फार शोचनीय आहे. व मास्तर मंडळी झटून प्रयत्न करून हा दोष काढून टाकितील व नावाच्या मोठेपणाप्रमाणें अंगचा मोठेपणा कायम राखतील असें आह्मी इच्छितो. रा. ब. डायरेक्टर साहेबही या विषयीं कांहीं विशेष तजवीज करणें अवश्यक असल्यास करितील व महाजनी यांसही बढती देतील अशी आह्मांस उमेद आहे.

---

लोकल फंडाकडील व म्युनिसिप्यालिट्याकडील पत्रव्यवहारास तिकडील आफिसरानीं पुढीलें एप्रिल माहिन्यापासून सर्व्हिस टिकिटें लावू नयेत असा ठराव झाला आहे. लोकलफंड व म्युनिसिप्यालिट्या यांचे पत्रांस जबाब देण्याचे कामीं सरकारी आफिसरांनीं सर्व्हिस टिकिटें लावण्यास हरकत नाहीं. त्या खात्याकडील मूळ पत्रांस सार्व्हिस टिकिटाची मनाई होणार आहे.

---

ले० कर्नल अलेकझांडर साहेब सुप्रिंटेंडिंग इंजिनियर व रेसिडेंट साहेबांचे सेक्रेटरी यांनीं दोन वर्षांची फर्लो रजा घेतली. त्यांचे जागेवर मेजर फार्बस यांस नेमिलें व ते आपले कामावर रुजू झाले.

---

मि० लेस्ली पश्चिम वऱ्हाडचे असिस्टंट इंजिनियर यांस सिकंदराबादेकडे नेमिलें व मि० कूड यांस पश्चिम वऱ्हाडाकडे दिले.

---

मेजर प्यारर साहेब इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिस यांस ६ महिन्यांची फर्लो रजा मिळाली.

---

रा. रा. विष्णु सदाशिव पिंसोळकर रेसिडेंट साहेबांचे क्लार्क आफ धि कोर्ट एथेंच आहेत. परवाचे दिवशीं उमरावतीस जातील.

---

हिंगोलेहून तोफखान्याची एक तुकडी औरंगाबादेस जाण्याकरितां काल एथें आली आहे. उद्यांक पुढें जाईल.

---

मूर्तिजापुरचे रा. रा. जनार्दन गोविंद जमादार यानीं झालेल्या शिक्षेबद्दल जुडिशियल कमिशनर साहेबाकडे अपील केलें होतें त्याची चौकशी होऊन शिक्षा कायम झाली.

---

उमरावतीस रेसिडेंट साहेब गेले ह्मणजे एक मोठा बाल होणार आहे.

---

हैदराबादेस मद्रास युनिवर्सिटीच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेवर देखरेख ठेवण्यास रेसिडेंट साहेबांनीं ४ गृहस्थांची एक कमिटी नेमिली आहे.

---

## वर्तमानसार.

---

मुंबई एथील हायकोर्टांतील जडज आन. मि. ग्रीन साहेब हे अर्धांग वायूनें आजारी आहेत.

काबूलच्या आसपास फार बर्फ पडून पेशावरच्या वाटेवर हत्ती, उंट, बैल वगैरे ओझ्यांचीं जनावरें पुष्कळ मेलीं. काबुलास लाकडें रुपयाची १९ शेर विकतात. तुर्कस्थानाकडील रस्ता बर्फानें बंद पडला अशी काबुलाकडून बातमी आली आहे.

रा. रा. गणेश वासुदेव जोशी यांनीं प्रयत्न करून धुळें मुक्कामीं लवाद कोर्टांची स्थापना केली.

इचलकरंजीकर नाटककार मंडळी मुंबईंत सुमारें दोन महिने खेळ करीत होती ती मागच्या गुरुवारीं बडोद्यास गेली.

बी. ए. च्या परिक्षेत ४९ उमेदवार पास झाले.

अमीर याकूबखान यांचा धाकटा मुलगा काबुलास बायका मंडळी बरोबर आहे. दुसरे

मोटे व मुख्य सरदार सरकाराशीं स्नेहभाव.नें वागणारे वलीमहमद, इब्राहिमखान, याकूबखान यांचे वडील बंधू; शेरअली यांचा नातु, अहमद अली महमदशरिफ. देहरादून यांचा वडील मुलगा हशीमखान व दाऊदखान असे काबुलास आहेत असें समजतें.

शरिराचें संरक्षण कसें करावें, याबद्दल वायव्य प्रांताच्या सरकारानें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. हें पुस्तक शाळांतून शिकवावें ह्मणून हिंदुस्थान सरकारानें ठराव केल्याचें कळतें.

राशियाचे बादशाहा मस्कोहून सेंटपीटर्स्बुर्ग येथें ता. ९ रोजीं गेले. त्यांचा घात करणाऱ्या लोकांनीं मस्कोच्या रस्त्यावर आगगाडीच्या जवळ एक घर घेऊन तेथून रस्त्याच्या खालून पोखारलें होतें असें समजतें.

" अपर इंडिया पेपर मिल्स कंपनी" या कागद तयार करणाऱ्या उत्तर हिंदुस्थानांतील कंपनीनें विलायतेहून या कामासंबंधी बरीच चांगलीं यंत्रें मागविलीं आहेत असें समजतें. या मंडळीचें भांडवल तीन लक्ष रु. जमलें आहे. ने० ओ०

पुणे एथील प्रार्थना समाजाच्या नवव्या वार्षिक उत्साहास शनिवार तारीख ६ रोजीं आरंभ होऊन गुरुवार तारीख ११ पर्यंत तो चालला. प्रथम दिवशीं समाजाच्या सभासदांची व आश्रयदात्यांची सभा होऊन गेले सालचा रिपोर्ट वाचण्यांत आला व नवीन सालाकरितां म्यानेजिंग कमेटी नेमण्यांत आली दुसरे दिवशीं ह्मणजे तारीख ७ रोजीं सकाळीं व संध्याकाळीं अशी दोन वेळ ईश्वरोपासना झाली. दोन्हीवेळ लोकांची पुष्कळ गर्दी झाली होती. सकाळीं रा. रा. वामन आबाजी मोडक यांणी प्रार्थना व उपदेश केला. विषय नामस्मरण हा होता. संध्याकाळीं प्रो. रामकृष्ण गोपाळ भांडारकर याणीं उपासना केली. जेव्हां धर्माची ग्लानी होते ते व्हां ती मोडून टाकून पुन्हा धर्म स्थापन करण्या करितां मी अवतार घेतो अशा अर्थाची भगवतगीतेंतील कृष्णोक्ति घेऊन भांडारकरानीं व्याख्यान दिलें. दोन्ही वेळचे विषय भक्तीवर असून सर्व धर्मांतील लोकांस अनुलक्षून होते. सोमवारीं रा. वामनराव मोडक याणीं इंग्रजींत व्याख्यान दिलें 'हिंदुस्थान देशास इतकी निकृष्ट दशा प्राप्त होण्याचीं कारणें, ती नाहींशी करून देश सुधारणुकेकरितां आज पर्यंत झालेले अनेक उपाय,, हा व्याख्यानाचा मुख्य विषय होता. मंगळवार तारीख ९ रोजीं प्रो. भांडारकर याणीं महाभारतांतून पुराण सांगितलें. विषय खरा धर्म कोणता व त्याचीं फळें काय? असा होता. दुसरे दिवशीं संगती सभा झाली. त्या वेळीं रा. गणपत भास्कर कोटकर याणीं ब्राह्म धर्माचे सिद्धांत व मतें काय आहेत हें सांगितलें. गुरुवार हा उत्साहाचा शेवटचा दिवस होता. त्या दिवशीं रा. मोडक याणीं कीर्तन केलें. तें फार मनोवेधक व बोधपर होतें. एकंदरीनें हा उत्साह चांगल्या रीतीनें शेवटास गेला हें लिहिण्यास आह्मास आनंद होतो. ज्ञा. च.

गेल्या मंगळवारी मुंबईहून एक कैदी ठाण्यास आणला असून तो कोठून व कशाकरितां आणला आणि तो कोण आहे हें कांहींच समजलें नाहीं. पुरुष फार उंच, देखणा व गोरा असून पायांत स्टाकिंग व उत्तम प्रकारचे बूट असून त्यांच्यावरून भक्कम बेड्या होत्या व एक लहानसें वस्त्र नसलेलें असून सर्वांगावर दुसरें कांहींच वस्त्र नव्हतें व त्याच्या संरक्षणार्थ त्याच्या बरोबर एक गोरा अफिसर व दोन शिपाई असे होते. इं. प्र.

चालू वर्षांत गहूं व कणीक मिळून ४६ कोटींचा माल विलायतेंत परदेशांहून गेल्याचें समजतें.

काबूल शहरापासून पन्नास लक्ष रुपये दंड घेण्याचें टरल्याचें समजतें.

वैदान येथील सोन्याच्या खाणीचें काम चालविण्याकरितां लंडनमध्यें कंपनी झाली आहे व तिचें भांडवल दहा लक्ष रु. आहे असें कळतें.

ग्लासगो येथें ग्लाडस्टन साहेब यांणीं ता. ९ रोजी भाषण केलें त्यांत हिंदुस्थान सरकारच्या राज्यव्यवस्थेच्या प्रकारास दूषण दिलें तसेंच काबूलची लढाई होणें रास्त नव्हती व त्याचा परिणाम धोंटाळ्यास कारण होईल असें त्यांणीं सुचविलें.

राशियन सरकारानें सरदार नेक महमद यास चांदीचें भांडें सन १८७७ सालांत वर अक्षरें खोदलेलीं असें दिलेलें काबुलास सांपडल्याचें कळतें.

बगाल्यांत ब्राह्मसमाजांतलि लोकांनीं मोठ्या धैर्यानें बालविवाहाची दुष्ट चाल मोडण्याचा क्रम चालविला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांजमध्यें एकंदर ब्राह्मविवाह गतवर्षापर्यंत ७८ झाले. त्यांपैकीं ५१ वधूंचां वये केवढीं होती याचा लेख आहे. बाकीच्या वधू लग्नसमयीं केवढ्या मोठ्या होत्या हें सांगतां येत नाहीं. सदहू ५१ लग्नांच लेख आहे त्यावरून असें दिसतें कीं, त्यांपैकीं चार नवऱ्या बारा वर्षांच्या वर परंतु चवदा वर्षांच्या आंत होत्या, आणि बाकीच्या ४७ नवऱ्या सर्व चवदा वर्षांहून अधिक वयाच्या होत्या. ५१ वध्वांपैकीं १६ नवऱ्या १६ वर्षांच्या आंत होत्या, आणि बाकीच्या सोळा वर्षांच्या किंवा त्याहून अधिक वयाच्या होत्या. सु० प०

---

## श्वासोश्वास शुद्धि.

ही किती उपयोगी व आरोग्यकारक आहे हें समजण्या करितां श्वासोच्छ्वास कसा चालतो याविषयीं थोडीशी माहिती असली पाहिजे. मनुष्यांचा व इतर सर्व प्राण्यांचा जन्मापासून तों मेरेपर्यंत श्वास एक पळभर सुद्धां बंद रहात नाहीं. एका मिनिटांत सुमार पंधरा वेळही श्वासोच्छ्वासाची क्रिया घडते' व तिला साह्यभूत केवळ फुप्पूसच आहे असें नाहीं, तर काळीज, डायाफ्रम, व बरगड्यांला लागून असणोर स्नायूही आहेत. मनुष्याच्या शरीराचा मध्यभाग ह्मणजे धड हें बाहेरून जसे पोकळ दिसतें तसें तें नाहीं. आंतून जीवनशक्तीस अवश्य अशा इंद्रिय रचनेनें भरलेलें आहे. ह्या भागाचे आंतील दोन निरनिराळे भाग डायाफ्रम नावाच्या जाड स्नायूच्या पडद्याचे आहेत. हा स्नायू (पडदा) शिंपीपासून बरगड्यांच्या शेवटांला दोन्हीं बाजूनीं पाठीमागें पाठीच्या कण्यापर्यंत एकसारखा लागत गेला आहे. ह्याची आकृती चिनई पंख्या सारखी असून हा श्वासोच्छ्वासाबरोबर नेहमी वर खालीं होत असतो. आतां ह्या पडद्यावरील भाग ह्मणजे मनुष्याची छाती त्यांत फुप्पुसाचे दोन बाजूंत दोन भाग व त्यांमधील रुधिराभिसरणाचे मुख्य स्थान काळीज हीं असतात. प्रत्येकाचें काळीज त्याच्या मुठी एवढें असून ते थोडेसें छातीच्या डाव्या बाजूस असतें. बरगड्यावर एक बोट ठेवून दुसऱ्या हाताच्या बोटानें वर ठोकलें तर साधारण नगाऱ्यासारखा आवाज सर्व छातीभर निघतो; परंतु हा आवाज छातीच्या पुढल्या भागास जेथें काळीज उडत असतें तेथें ऐकूं येत नाहीं. फुप्पूस स्पंजासारखें असतें व त्यांत नेहमीं हवा भरलेली असते ह्मणून ठोकल्यावर असा पोकळ ध्वनी निघतो.

गळ्यावर हात ठेवून पाहिलें तर नरडीची नळी साफ हातास लागते. हीच नळी गैंळ्यांतून छातीच्या होटापर्यंत जाऊन तिचे तेथें दोन विभाग झाले आहेत व ते प्रत्येक फुप्पुसांत शिरतात. तेथेंही प्रत्येक नळीला दोन दोन भाग याप्रमाणें असंख्य फांद्या त्यास फुटतात व प्रत्येक शेवटच्या फांदीला किंवा पोकळ नळीला एक लहान रक्तवाहिन्याची पिशवी असते. ह्या सर्व नळ्या व रक्तवाहिन्या मिळून फुप्पूस बनलें आहे. नरडीचें तोंड जिभेच्या पाठीमागें घशांत असतें व त्यांत अन्न किंवा उदक जाऊं नये ह्मणून एक झाकण केलें आहे. श्वास आंत घेतला कीं नरडीच्या द्वारानें हवा आंत शिरून फुप्पूस व त्याच्या सर्व नळ्या भरून जातात. श्वासोच्छ्वास जरी आपल्या स्वाधीन राखतां येतो तरी तो फार वेळ पर्यंत बंद ठेवणें आपल्या स्वाधीन राहत नाहीं. श्वासोच्छ्वासाचीं कारणें दोन आहेत. फुप्पुसाच्या नळ्यांत लवचीक तंतू असल्या कारणानें रबराच्या नळ्यासारख्या नळ्या श्वासानें फुगतात व अकुंचित होऊन त्यांपासून श्वास बाहेर निघतो. ह्या कृतीला सभोवतालच्या स्नायूच्या आकुंचनापासून फार मदत मिळते. डायाफ्रम पडद्याचे आकुंचन झालें ह्मणजे त्याला दसलेलें फुप्पूस ताणलें जातें व अशानें हवा आंत शिरून छाती वर फुगून येतें. ती फुगल्यानंतर फुप्पूस लवचीक असल्यामुळें आकुंचित होऊन त्यांतून बरीच हवा उश्वासावाटे बाहेर पडते व पुन्हा छातीत उतरते.

आतां हवा आंत घेतो व बाहेर टाकतो ह्यांत काय फेर आहे तो पहा.

आंत घेतलेलो हवा.

| | |
|---|---|
| ऑक्सिजन | २,१०० भाग |
| नैट्रोजन | ७,९०० भाग |
| कारबॉनिक असिड | ३ ,, |

श्वासोच्छ्वासावाटे बाहेर टाकलेली हवा.

| | |
|---|---|
| ऑक्सिजन | १.७०० भाग |
| नैट्रोजन | ७,९०० ,, |
| क्यारबानिक असिड | ४०० ,, |

ह्या प्रमाणावरून आपल्या श्वासोच्छ्वासांमुळें हवेंत काय फेरफार होतात तें समजेल. हवेमधील कांहीं आक्सिजन वायू आंत घेऊन त्याच्या ठिकाणीं आपण तींत ज्यास्त कारबानिक आसीड आणतों इतकेंच नाहीं. त्या खेरीज वाफ रूपी पाण्याचा अंश व शरीराचे अंश श्वासांतून बाहेर पडतात. कांहीं आक्सिजन ग्यास आपण आंत घेतों त्याचें काय होतें व कारबानिक आसिड कोठून उत्पन्न होतो इत्यादि शंका सहज उत्पन्न होती ल. वर सांगितलेंच आहे कीं नरडीची नळी फुप्पुसांत बारीक होत जाते व प्रत्येकीच्या शेवटास केशापेक्षांही बारीक अशा रक्तवाहिन्यांची एक पिशवी असते त्या पिशवीस श्वासाबरोबर आंत घेतलेल्या हवेचा स्पर्श होऊन तिच्या मधील रक्त सूक्ष्म दर्शक यंत्रानें पाहिलें असतां लाल व पांढरे परिमाणूंचें बनलेलें दृष्टीस पडतें. त्या पैकीं तांबड्या अणुरेणूंस जाऊन ऑक्सिजन ग्यास मिळतो व अशा रीतीनें तो सर्व शरीर भर पसरून अवयवाच्या व्यापाराच्या कामास लागतो व तेच परिमाणू स्पंजाप्रमाणें झालेल्या शरीराचे अणुरेणू शोधून घेऊन पुन्हा फुप्पुसांत येऊन कारबानिक आसिड व इतर तशा प्रकारचे पदार्थ बाहेर टाकून देतात. हें रक्त येतें कोठून ही एक शंका राहिली. दोन फुप्पुसांच्या मध्यें काळीज ह्मणून स्नायूच्या सात पडद्याची मिळून बनलेली एक रक्ताची पिशवी आहे. हिची आकृती साधारण लांबट आंब्यासारखी असून त्यांत मुख्य दोन भाग आहेत, आणखी त्या प्रत्येकांत दोन दोन भाग आहेत. ह्मणजे उजव्या बाजूस दोन व डाव्या बाजूस दोन अशा चार पिशव्या आहेत. रक्त सर्व शरीरांत फिरून मलीन होऊन उजव्या बाजूच्या एका पिशवींत येतें व तेथून त्याच बाजूच्या दुसऱ्या पिशवींतून एका मोठ्या नळीमधून फुप्पुसांतील बारीक रक्तवाहिन्यांत शिरून वर सांगितलेली हवेचीं सर्व रसायनक्रिया त्यावर घडून शुद्ध होतें व चार वाहिन्यांनीं डाव्या बाजूच्या पिशवींत शिरून तेथून मोठ्या एका धमनीच्या द्वारें सर्व शरीरांत जातें.

हें सर्व श्वासप्रकरण सांगण्याचें कारण इतकेंच कीं सर्वांनां आपल्या शरीराची माहिती चांगली व्हावी व श्वासोच्छ्वास ही किती महत्वाची क्रिया आहे हें त्यांच्या नजरेस स्पष्ट यावें इतकेंच आहे. श्वास बिघडण्याचें कारण तोंडाला दुर्गंधी सुटणें. हें दांत कुजलेले असले किंवा घशाच्या दोन कमानीमधील श्लेश्मपिंडांतून दुर्गंधी श्लेश्मा निघतो किंवा जठर क्रिया बिघडून अन्नपचनादि व्यापार बरोबर चालत नाहींत किंवा ज्यांस तंबाकु खाण्याची किंवा ओढण्याची सवय असते, अशा लोकांनीं मागील अंकांत सांगितल्याप्रमाणें मुखमार्जन करतेवेळीं पाण्यांत सुवासीक पदार्थ घालून गुळण्या टाकाव्या व अशानेंही तोंडाची घाण गेली नाहींच तर एकाद्या सुज्ञ वैद्यास विचारावें, तंबाकूची व कुजलेल्या दांताची घाण काढून टांकण्यास पुढील औषध फार उपयोगी पडेल.

| | |
|---|---|
| समुद्रक्षार | तोळे ३ $\frac{३}{४}$ |
| टार्टेट पोल्याश | तोळे $\frac{३}{४}$ |
| पुदिन्याचें तेल | ,, $\frac{१}{२}$ |
| सफेत साखर | ,, २० |

इतक्याचे खलब्यांत नीट मिश्रण करून त्याची पूड एक चिमुटभर तोंडांत टाकावी किंवा यांत गोंदाचें पाणी घालून त्याच्या गोळ्या बनवाव्या. व जितकी थुंकी सुटेल तितकी न गिळतां थुंकून टाकावी ह्मणजे तोंडाची दुर्गंधी मोडेल. सु. प.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १८  अकोला, रविवार ता० २८ माहे डिसेंबर सन १८७९ इसवी.  अंक ५०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | ६० |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी झणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८३ |
| ,, दुसरे खेपेस | ८२ |

## मुंबई बँक.

अमानत ठेविलेल्या पैशावर व्याजाचे दर

१२ महिने ठेविल्यास दरसाल दर शे कडा ४ रुपये.

६ महिने ठेविल्यास (झणजे तारीख १ नोवेंबर पासून ता० ३० जूनपावेतों एकसारखे कोणतेही सहा महिनेपर्यंत दरसाल दर शेकडा ३ रुपये प्रमाणें.

सदर्हू प्रमाणें न ठेविल्यास दरसाल दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याज मिळेल.

तात्पुरती किंवा मुदाम व्यवस्था केल्याशिवाय कमी मुदतीपर्यंत अथवा अधिक व्याजानें अमानत पैसा ठेविला जाणार नाहीं.

चालू अमानत पैशाच्या खात्यावर व्याज दिलें जाणार नाहीं.

मुंबई.

तारीख १ आगष्ट सन १८७९ इसवी.

## नादारी प्रकरणीं नियम.

वऱ्हाडांत नादारी संबंधी जो कायदा हल्लीं चालू आहे व ज्याच्या प्रति मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं सरकारी कचेऱ्यांतून वहिवाटीकरितां छापून दिल्या आहेत तीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत आठ आणे. बाहेरगावी पाठविण्यास एक आणा अधिक लागेल.

## सुबोधसार

भाग पाहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें गहुतेक व्यवहारज्ञास व विशेषेकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समय विशेषीं कसें बोलावे व वागावें वगैरे अनेक प्रकारचे ज्ञान होण्यासारखे आहे जडार्थग्रंथ कागदावर खिळे छापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ८१० आणे टपाल खर्च ८८६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक तावडतोब रवाना केलें जाईल. कळावें. ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## कौमुदीमहोत्साहः.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकाम, ध्ये " सिद्धांत कौमुदी " संस्कृत व्याकरण- आणि याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्वभाग इतकें संपूर्ण झालें, पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें- किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प- झणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस " पोष्टपेड " पत्रीं कळवावें झणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर

कौमुदीमहोत्साहकर्ते.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें किंमत ८६ आणे.

हें औषध गजकरण शिवायकरून खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वी आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यांपासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिलक नव्हत्या व तेणेंकरून यारोगानें पीडलेली गिऱ्हाइकें परत गेलीं झणून आह्मी या औषधाच्या डब्या मुदाम आणिल्या आहेत. तारीख १० माहे आक्टोबर सन १८७८ इसवी.

## नवीन दिवाणी कायद्या-संबंधी सर्क्युलरें

वऱ्हाडाकरितां अलीशान रेसिडेंट साहेबांनीं तयार करून रेसिडेन्सी आर्डरमध्यें जीं नवीन दिवाणी कायद्यासंबंधी सर्क्युलरें छापून प्रसिद्ध केलीं व ज्यांचें मराठी भाषांतर मे० जुडिशियल कमिशनर साहेबांनीं छापवून कोर्टांनिहाय दिलें त्याच्या प्रति वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. किंमत सहा आणे. बाहेर गावी एक आणा अधिक पडेल.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मताशीं मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. जरी माझा व आपला पूर्वपरिचय नाहीं. तरी आपण खालीं लिहिलेल्या मजकुराचा अव्हेर न करितां आपले पत्रीं जागा द्याल, अशी आशा आहे.

मौजे खैरी हा गांव वणी जिल्ह्यांतील केळापूर तालुक्यांत आहे. येथें सुमारें ५०० घरांची वस्ती आहे. बहुतेक वस्ती कुळंबी लोकांची असले कारणानें या गांवीं जातीसंबंधानें नेहमीं दुफळ्या असतात. येथें रा. रा. पुंजाराम वलद बाबाजी हे पाटिलकीचें काम करीत आहेत. हे गृहस्थ जातीचे कुळंबी आहेत तरी यांचे सारखे हुषार, मनमिळाऊ आणि उदार असे पुरुष ह्या जिल्ह्यांत थोडेच आढळतील. या गांवीं शाळाही आहे. व यांचें शाळेकडे पूर्ण लक्ष आहे. यांणीं दोन चार वेळां शाळेसही बक्षीस वगैरे हरतऱ्हेची मदत दिली आहे. तसेंच गांवांत उतारू लोकांस उतरण्यासाठीं धर्मशाळा नसल्या कारणानें फार अडचण पडते. सबब यांणीं स्वतः जातीनें २०० रुपयेपर्यंत खर्च करून एक धर्मशाळा (सराई) बांधण्याचें काम सुरू केलें आहे. यांचे लक्ष सरकारी कामांत फार चांगलें आहे. गांव सफा ठेवणें व हुद्देदार लोकांची सरबराई करणें हें आपलें कर्तव्यकर्म जाणून, त्या कामीं त्यांचे लक्ष विशेष आहे. पत्रकर्ते महाराज, अशा पुरुषास त्याच्या योग्य वर्तणुकीचें फळ ईश्वर देवो, अशी माझी प्रार्थना आहे कळावें ता० १९ माहे डिसेंबर सन १८७९ इ.

मुकाम खैरी.

एक " मुशाफर."

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. मी अकोल्याहून पंढरपुराकडे आलो आहे. मार्गातील कांहीं हकीकत आपणास लिहितो.

इकडील हवापाणी ता. १६ मंगळवारीं व ता. १७ बुधवारीं वांचळ असून पंढरपुरास थोडे पावसाचे शितोडेही आले. गारठा बराच होता काल ता. १८ रोजीं मात्र ऊन पडलें होतें. हल्लीं हवा बरी आहे. इकडे बराच जंगल वैराण व पडीत आहे यास कारण मागील दुष्काळ सांगतात. क्वचित शेतें पेरलीं आहेत व तीं बरींही आहेत पण त्यांपैकीं दवानें पुष्कळ होरपळलीं गेलीं. व तीं मुख्य लेंकरून शाळूचीं. दौंडपनमाड रेल्वेवेतील गंगा, प्रवरा, मुळा व भिमा हे च्यार पूल मोठे तयार होणें आहेत. काम झपाट्यानें चालू आहे. दौंड लायनीवर गाडी मनमाडाहून सकाळीं ६ वाजतां चालू होते तिचा वेग साधारण बरा असतो पण तिचे प्रत्येक स्टेशनावर निरर्थक अर्ध अर्ध तास थांबल्यानें उतारू लोकांस मनस्वी कंटाळा येतो. कारणपरत्वें तास अर्धातास थांबून बाकीचे स्टेशनांवरून ५।१० मिनिटांत जर चालूं लागली तर हल्लीं जे ११ तास दौंडला पोंचण्यास लागतात ते ७।८ च पुरे होतील. ही रेल्वे जरी नवीनच आहे तरी झाडाझुडांनीं व फुलें बागशाईनें बरींच स्टेशनें मनोरम केलीं आहेत. केळींचीं व आंब्यांचींही झाडें पुष्कळ लाविलीं आहेत. प्रत्येक स्टेशनावर मोठा लावून पाण्यानें हौद भरतात व धारवाडी-कास्त्यानें माल वगैरे वजन करितात. आतां वेळ बराच झाला सबब पुरे करितो. कळावें. ता. १९।१२।७९

फिरस्ता.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपल्याकडे कांहीं मजकुराच्या चार ओळी पाठविल्या आहेत त्यास आपले सुंदर पत्रीं जागा द्याल अशी आशा करितों.

महाराज मी कांहीं कामाकरितां भुसावळेहून धोंडकडे जात असतां मार्गांत माझा [illegible] काम मनमाड ह्या गावीं झाल्या [illegible] नवल विशेष असेल तें [illegible] डी आहे. [illegible] विश्रांती [illegible] प्रकार पा[illegible]; तो धर्मशाळे नजीकच का[illegible]ण्याची गिरणी पाहावयास [illegible]वर गाव पाहावयास गेलों. [illegible]चे कांहीं नजरेस पडलें नाहीं. [illegible]दीचे मार्गानें विऱ्हाडी जात [illegible] ठिकाणीं " मनमाड मरा[illegible] प्रमाणें इंग्रजी अक्षरानीं [illegible]र्ड पाहिला. त्यावरून मला [illegible]ला. नंतर मी कंपौंडचे [illegible]ठेच्या दाराशीं जातों तों, [illegible]रूपानें कोणास येण्याची [illegible] अशा अर्थाची पाटी लावि[illegible]हली व माझी आंत जा[illegible] पण मी तसाच निमुटपणें [illegible] उभा राहिलों. तों जवळ [illegible] नंतर [illegible] होते; त्यांची नजर मजवर येऊन, ते मजकडे आले. व मी कोण? कोठला? वगैरे प्रकारची हकीकत विचारून मला आपल्या वर्गांत नेऊन चांगली व्यवस्था ठेविली. नंतर माझें चित्त शांत झाल्यावर, त्यास शाळेसंबंधी कांहीं हकीकत विचारतां असें कळलें कीं, एथें सरकारी शाळा मुळींच नाहीं. परंतु एथील कांहीं सभ्य व विद्यामृत पान केलेले रेल्वे इंजिनियर आफिसांतील मंडळींनीं ही शाळा वर्गणीचे खर्चानें स्थापन केली आहे. व सरकारांतून ग्रांटही मिळतें असते. ह्याप्रमाणें ही मंडळी एथील लोकांस विद्यादान करित असते. एथील मंडळीचे हें वरील कृत्य पाहून कोणासही आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं.

असें आमचे बोलणें झाल्यावर हेड मास्तर कोठें? ह्मणून विचारतां त्यांनीं सांगितलें कीं, ते निजले आहेत. हें ऐकून मला फार आश्चर्य वाटलें. नंतर मी पुन्हा विचारलें कीं कां निजले? तेव्हा असें सांगितलें कीं, आज चैच काय? हें दरराजचेंच आहे ! ! दररोज ह्याप्रमाणें ४ वाजेपर्यंत निद्रा होते. नंतर सुटीचे वेळेपर्यंत गप्पा मारणें, पत्रें लिहिणें, पंचांग पाहणें वगैरे कांहीं स्वतांचीं कामें चालतात. हें ऐकून मला फार नवल वाटलें ! नंतर मी सदर मास्तर ह्यांचे बोलण्यावर भरवसा न ठेवितां, तसाच कांहीं वेळपर्यंत बसलों तों तें सर्व अक्षरशः खरें झालें व तेव्हां फार दुःख वाटलें. मुलांचे बाप पैसा खर्च करून त्यांस कांहीं तरी विद्या मिळावी ह्याकरितां ह्यांचे ताब्यांत देतात; परंतु त्यांस ती न मिळतां उलटा मूर्खत्वरूपी लाभ मात्र मिळतो. इकडे हेड मास्तर यांनीं पूर्ण लक्ष्य द्यावें. असें त्यांचे करण्यापासून ज्या मंडळींनीं त्यांस पगार देऊन ठेविलें त्यांचें चीज होत नाहीं व मुलांचाही आयुष्याचा काळ फुकट जातो.

ह्याकडे शाळेचे हितचिंतक लक्ष देतील अशी आशा करितो कळावें. हो विनंती.

मुक्काम मनमाड ता. २२।११।७९ इ० — एक फिरस्ता.

---

## जाहिरात.
## अकोला सेंट्रल जेल कडून.

अकोला सेंट्रल जेलांतील कैदी लोकांच्या खाण्यापिण्यास लागणाऱ्या जिनसा पुरविण्याचा तारीख १५ जानेवारी सन १८८० सालापासून १२ महिन्यांचा मक्ता देणें आहे. प्रत्येक जिन्नस रोज अंदाजानें किती लागेल त्याचा आकार त्या त्या जिनसेसमोर मांडला आहे.

रोज अंदाजानें लागणोर जिनसांचें प्रमाण.

| जिनसाचें नाव | म. शे. छ. |
|---|---|
| १ गहू दुसरे प्रतीचे आठवड्यांतून ३ वेळ | ८-२०-० |
| २ ज्वारी पहिले प्रतीची आठवड्यांतून ४ वेळ. | ९-०-० |
| ३ दाळ दररोज | २-०-० |
| ४ तूप | ० ४-० |
| ५ मीठ | ०-८-० |
| ६ मिरच्या | ०-२-० |
| ७ लांकडे | ५-०-० |
| ८ तैलपदार्थ गांवरानी तिळी किंवा आळशी. | १-३५-० |
| ९ लसूण दररोज | ०-२-० |
| १० हळद दररोज | ०-०-१८ |
| ११ धने | ०-१-० |
| १२ तांदूळ | |
| १३ लोकर कांबळे तयार करण्या करितां | |

प्रत्येक टेंडराबरोबर १०० रुपये अमानत ठेवण्या करितां धाडले पाहिजेत. जें टेंडर पसंत ठरेल त्याचे १०० रुपये कराराप्रमाणें टेंडर देणारानें चालावें त्याच्या खात्रीकरितां ठेविलें जातील. बाकीच्या टेंडर पाठविणारांचे रुपये एक कंट्राक्टर ठरण्याबरोबर परत केलें जातील.

वरील शर्तीप्रमाणेंच प्रत्येक टेंडराबरोबर प्रत्येक जिनसेचे निदान अर्ध शेर प्रमाणाचे नमुने मोहोरबंद करून पाठविले पाहिजेत.

प्रत्येक टेंडर मोहोरबंद असून रजिष्टर केलेल्या पाकिटांत धाडलें पाहिजे. पाकिटावर वाचतां येण्यासारख्या स्पष्ट अक्षरानें "जेलांतील कैदी लोकांकरितां रोजचें सामान पुरविण्याचें टेंडर" असें लिहिलें पाहिजे. तें पाकीट खालीं सही करणाराचे पत्यावर पाठवावें. किंवा जेल आफिसांत स्वतां आणून द्यावें ह्मणजे त्याबद्दल पावती मिळेल.

कोणत्याही सबबीकरितां कोणतेंही टेंडर येत्या जानेवारी महिन्याच्या ३ तारखेच्या दोनप्रहरा नंतर घेतलें जाणार नाहीं. ह्या तारखेस व सदरील वेळीं खालीं सही करणार टेंडरांवरील मोहरा तोडतील. सर्वांत कमी किंमतीचें व दुसरें एकादें अमुकच टेंडर स्वीकारण्याविषयीं आपणास बांधून घेत नाहींत. तारीख २६ माहे डिसेंबर सन १८७९ इसवी.

सुप्रिंटेंडेंट.
टी. ह्यूम.

---

## सार्वजनिक सभेचें मराठी मासिक पुस्तक.

या शहरांत आज बरींच वर्षे सार्वजनिक सभा स्थापिली गेली असून तिचें काम सतत चालू आहे हें सर्वांस विदित आहेच. या सभेनें गेल्या सालापासून एक इंग्रजी त्रैमासिक पुस्तक सुरू केलें आहे हेंही पुष्कळांस ऐकून तरी माहित असेलच. या त्रैमासिकांत सभेनें सरकारास पाठविलेले अर्ज वगैरे मजकूर असून खेरिज कांहीं स्वतंत्र लेखही असतात. ज्यांस इंग्रेजी येत नाहीं त्यांस वरीलें लेख समजण्याचा मार्ग नसल्यामुळें, व असल्या लोकांचीच संख्या फार असून त्यांस सभेत होणाऱ्या वाटाघाटींची माहिती होणें अवश्य असल्यामुळें, मराठी भाषेंत एक मासिक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा सदरील सभेच्या व्यवस्थापक मंडळीनें विचार केला आहे. बाहेरच्या लोकांस येथील सार्वजनिक सभेंत काय काम चालतें हें नीट समजावें, व अशा प्रकारच्या सभेपासून सरकारास व प्रजेस कितपत उपयोगी होण्यासारखा आहे इत्यादि गोष्टी सर्वांच्या लक्षांत चांगल्या प्रकारें याव्या, हा सांप्रत पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे.

हें मराठी मासिक पुस्तक सभेनें कित्येक हितचिंतकांच्या शिफारसीवरून प्रसिद्ध करण्याचा विचार केला आहे व हें काम खर्चाचेंही आहे. सबब राजेरजवाडे, सरदार, इनामदार, शेट सावकार वगैरे गृहस्थ आपला उदार आश्रय ह्या मासिक पुस्तकास देतील अशी उमेद आहे.

हें मासिक पुस्तक येत्या मार्च महिन्यापासून निघूं लागेल. याचा सांच्या इंग्रेजी त्रैमासिकाच्या येवढाच होईल. पृष्ठें दर अंकास ४० असतील. वर्षाची आगाऊ किंमत ४ रुपये ठेविली जाईल. बाहेरगांवच्या वर्गणीदारांस टपाल हाशीलाबद्दल ८६ आणे खेरीज पडतील.

भाषांतराचें काम रा० रा० विष्णु कृष्ण चिपळुणकर यांनीं पत्करलें आहे. येत्या जानुआरीच्या त्रैमासिक अंकापासून भाषांतरास सुरवात होईल. या पूर्वीच्या अंकांतील मजकूर व सभेची एकंदर हकीकत यांचें निराळेंच पुस्तक मागाहून काढण्याचा विचार आहे.

सदरील पुस्तकाच्या संबंधाचा हरएक प्रकारचा पत्रव्यवहार दुसरी जाहिरात येईपर्यंत खालीं सही करणारांचे नांवें ठेवावा. पुणें, ता० १८ दिसेंबर १८७९.

सिताराम हरि मांठे
शिवराम हरि चिपळुणकर,
चिटणीस, सा० सभा पुणें.

---

## NOTICE.

The undermentioned Tents lately in use with the Judicial Commissioner Hyderabad Assigned District will be sold by auction in the compouned of the Court-House at Akola on the 12th January 1880 at A. M.

1 Swiss Cottage tent 16 × 16
1 Shamiana———— 18...18

The tents will be pitched on the day previous for inspection, and the terms of sale will be made known at the time of Auction.

J. G. Bell
Judicial Commissioner
H. A. D.

---

# वऱ्हाडसमाचार.

मिति मार्गशीर्ष शुद्ध १५ शके १८०१

## उमरावतीलायब्ररीचा ऊर्जितकाळ.

वऱ्हाडांत लायब्ऱ्या थोड्याच आहेत. व ज्या आहेत त्यांचीही विशेष चांगली स्थिति आहे असें नाहीं. विलायतेंत कांहीं लायब्ऱ्यांतून पुस्तकें आहेत तीं लक्षांनीं मोजलीं जातात व त्यांपैकीं कित्येक शेकडो वर्षें चालल्या असून त्यांस हजारों रुपयांचें उत्पन्न आहे. तसा भाग्योदय आमचे देशाचाच नाहीं, मग लायब्ऱ्यांचा कोठून असेल? तरी हल्लीं विद्येचें राज्य आहे ह्मणून लायब्ऱ्यांची उभारणी तिच्या मानानें वाढत्या कलावर असली पाहिजे. व तशी आमच्या उमरावती लायब्ररीची होत चालली आहे हें आह्मांस कळविण्यास संतोष वाटतो.

उमरावती लायब्ररींत पुस्तकांचा संग्रह चांगला आहे. वर्गणीचें उत्पन्न चांगलें आहे. म्युनिसिप्यालिटीची तिला २५ रु. देणगी दरमहाची आहे. एक चांगलें स्थळ तिला एके सावकारानीं दिलें आहे. वर्तमानपत्रें पुष्कळ घेतात व पुस्तकेंही प्रतिवर्षीं नवीं नवीं आणवितात. चार लोक नित्य तेथें वाचावयास जातात, व सभा वगैरे हमेशा तेथें होत असतात. यावरून त्या शहरास ती लायब्ररी हें मोठें करमणुकीचें, अवश्यकतेचें व विश्रांतीचें स्थल झालेलें आहे. अशी स्थिति आज बरींच वर्षें आह्मी पहात आहो. व हल्लींही एक मोठी स्तुत्य व आनंदाची गोष्ट आह्मी तिजविषयीं ऐकिली आहे. ती हीः—

उमरावती तालुक्यांतील पुसद गावचे रा. रा. परशराम बापुजी पाटील यांनीं उमरावती लायब्ररीस तिचें स्वतांचें घर बांधण्यासाठीं १००१ एक हजार एक रुपयांची देणगी दिली. त्याचप्रमाणें रा. रा. सदाशिव नारायण वकील मुंबईकर यांनीं २०० दोनशें रुपयांची देणगी दिली. या गोष्टीबद्दल सदर्हू उभयतां गृहस्थांचे व साधारण पाटील असून त्यानें एवढी मोठी रकम दिल्या बद्दल विशेषें त्याचे आह्मी आभार मानितों. सुमार पांच हजार रुपये खर्च करून भुसार दरवाजाचे वर दोन्ही बुरूज साधून सुंदर इमारत लायब्ररीकरितां बांधावी अशी तेथील मंडळी खटपट करीत आहे. तिच्या प्रयत्नास त्वरित यश येवो असें आह्मी इच्छितों व मंडळीच्या स्तुत्य परिश्रमाची तारिफ करितों.

आमची अकोल्याची लायब्ररी पुन्हा दैन्यावस्थेस येत चालली आहे. तिला कोणी असाच हरीचा लाल आश्रय दाता भेटून मंडळीस उत्तेजन देईल तर फार चांगलें होईल. परमेश्वर कोणाचे हृदयांत शिरून त्यास प्रेरणा करो.

---

## शेतकीची सुधारणा.

सर्व देशहितेच्छु लोकांचे मनांत हा विचार घोळत असतो कीं, आपल्या हिंदुस्थानांतील शेतकीची सुधारणा व्हावी ह्मणजे देश सुखी होईल. व खरोखरच हिंदुस्थानचें मुख्य उत्पन्न ज्या अर्थीं शेतकीपासून आहे त्या अर्थीं तिची सुधारणा अवश्य झाली पाहिजे. मात्र ही केवळ विद्वान लोकांची इच्छा ! ! बाकी अमुक उपायानें शेतकीची उत्तम प्रकारें सुधारणा होईल अशी कोणाची खात्री होऊन तसा प्रकार सुरू होत नाहीं ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे ! ! !

आतां शेतकी करणारांकडे पाहिलें असतां ते केवळ अक्षरशून्य . शेतकीची सुधारणा ह्मणजे काय हें त्यांस मुळींच समजत नाहीं, ते आपल्या पूर्वापार चालत आलेल्या रूढीप्रमाणें गळली गुंगी जनावरें, व ओबडधोबड अवजारें यांच्या योगानें शेतांतील गवत काडी काढून कशी तरी पेरणी करितात व जें पीक येईल तें काढून घेतात; या शिवाय त्यांस सुधारणा ह्मणून काय पदार्थ असतो तो ठाऊक नाहीं. ही पूर्वापार जे लोक शेतकीचा धंदा करीत आले त्यांची गोष्ट झाली. या शिवाय पुष्कळ निरनिराळ्या धंद्याचे लोक अलीकडे शेतकीस अनुसरले आहेत. त्यांचे हाल तर बोलावयासच नको कारण त्यांस जें कांहीं पूर्वापार थोडेंबहुत कसब अवगत असतें तें करून त्यांस पोटभर भाकर मिळेनाशी होते ह्मणून, व "उत्तम शेती, मध्यम व्यापार" यास अनुसरून ते उत्तमाकडे धाव घेतात; पण तो शेतकीचा धंदा त्यांचे हातवळणीं नसल्यानें व त्यांतील पुष्कळ नाजुक गोष्टींची त्यांस माहिती नसल्यानें ते कशी तरी लागवड करितात व जें अर्धे निर्धें पीक येईल तें घेऊन लोकांस शेतकीची अधिक दुर्दशा दाखवितात.

असे पुष्कळ गैर माहिती लोक शेतकी करूं लागल्यानेंही पुष्कळ तोटे होऊं लागले. एक तर शेतांची किंमत वाढली. ह्मणजे नव्यांनें शेती करावयास निघालें ह्मणजे ज्या शेताचा सारा १० रुपये देऊन कोणा शेतकऱ्याची पुरी पडली नाहीं व त्यांस तें शेत विकून मोलमजुरी करण्याचा प्रसंग आला, त्याच शेताचा हा नवखा मनुष्य १५।२० रुपये सारा देण्यास तयार होणार. मग काय विचारतां? एक दोन वर्षे तर कसें तरी मोठ्या उमेदीनें तो नवीन धरलेला धंदा चालवितो. पण पुढें पहिल्याचा प्रसंग दुसऱ्यावरही येऊन चितलाच समजावयाचा. असा एकसारखा क्रम चालू आहे. तथापि मोठी आश्चर्याची गोष्ट आहे कीं, असे शेकडो लोक शेतकी करून नाउमेद होत आहेत तरी तिचें "उत्तम" हें विशेषण पाहूनच दुसरे पुष्कळ लोक तिजवर झडप घालतात. व तेणेंकरून दिवसेंदिवस ती अधिक मौल्यवान होऊं लागली आहे. मग सुधारणा कशी व्हावी? अधिक दुर्दशाच!

इतर धंद्यांपासून उत्पन्न मनुष्यास जसें आपल्या स्वपराक्रमानें व कलाकौशल्यानें पूर्ण काढून घेतां येतें तसें या शेतकीपासून घेतां येत नाहीं. तें सर्वथैव 'ईश्वरेच्छेवर अवलंबून रहातें. मनुष्य होईल तोंवर "वारा येईल तशी पाठ फिरवितो" तरी केव्हां पर्जन्यवृष्टी कमी होऊन, केव्हां अधिक होऊन, केव्हां थंडी कमी वा अधिक होऊन केव्हां अकाळीं पर्जन्यवृष्टी व नुसतीं मळभें येऊन जे कांहीं अनर्थ कोसळतात ते केवळ दुर्निवार्य. जेथें आज अनादिकालापासून मोठमोठ्या विद्वानांसही उपाय सुचले नाहींत तेथें आमचे गरीब व अडाणी शेतकरी लोकांचा काय पाड आहे? जेव्हां जेव्हां ही आकाशची कुऱ्हाट त्या बिचाऱ्या शेतकरी लोकांवर कोसळते तेव्हां तेव्हां ते एकदम चिरडून जातात ते असेः—

वर्षाऋतूच्या आरंभीं शेतकरी लोक कपाशी व ज्वारी यांची पेरणी करितात. पुढें त्या पिकांस थोडथोडें जीवन मिळाल्यास तीं चांगला धजाव धरतात; पण जर एकसारखा मोठा पाऊस कांहीं दिवस लागून राहिला; अगर कांहीं दिवस बिलकूल पाऊस आला नाहीं कीं, पेरलेलें बीं रसातळास जाऊन शेत जसेंचे तसेंच! तेव्हां बिचाऱ्या शेतकऱ्याचे पहिले श्रम व बीं व्यर्थ जाऊन पुन्हा शेत तयार करून दुसरें धान्य पेरण्याची तयारी करावी लागते. तेणेंकरून कसें तरी पीक आपल्या भरांत येतें तों केव्हां केव्हां अकाळीं वृष्टीच आपला हात दाखविते. तेणेंकरून कपाशीचीं फळें, फुलें, व ज्वारीचा फलोर नाहींसा होतो. नुसतें आभाळ जरी दगांनीं व्याप्त झालें तरी तुरी, हरभरे, लाख, वाटाणे, यांच्या पिकांवर विघ्न येतें. तें इतकें कीं जितकें बीं पेरलें तितकें सुद्धां धान्य हातीं येत नाहीं.

थंडी पडणें व मळभ किंवा दगें येणें हे प्रकार एकमेकांचे विरुद्ध आहेत थंडी बहुतेक सर्व पिकांस चांगली पोसते. व मळभ आणि दगें यांच्या योगानें कांहीं पिकांवर विघ्न येतें ह्मणजे किडे उत्पन्न होतात व ते सर्व धान्य खाऊन फस्त करितात.

"युक्ताहारविहारस्य" यास अनुसरून थंडीही बेताची असली तरच सुखावह होते व पिकांस पोसते, पण तीच जर मनस्वी पडूं लागली तर पिकें होरपळतात. हल्लीं दूरदूरून आरोळ्या ऐकूं येत आहेत कीं, कित्येक ठिकाणीं कपाशी व क्वचित ज्वारी मिरची वांगीं इत्यादि पिकांची अति थंडीनें फार नासाडी झाली. पुढें. चालू.

---

टाईम्स आफ इंडिया— पत्राची पुढील शनिवार पासून एक आठवडा प्रत हिंदुस्थानचे रहाणारांकरितां निघणार आहे. या पूर्वी विलायतेस जाणारी आठवडा प्रत हिंदुस्थानांत वाटीत असत. तिजमध्यें विलायतेकडील बातम्या नसत. आतां ती प्रत विलायते करितां वेगळी व हिंदुस्थानच्या लोकांकरितां ही दुसरी प्रत निघणार आहे. हिजमध्यें सर्व ठिकाणचे सर्व तऱ्हेचे मजकूर येतील. शिवाय महिन्यास एक वेळे चित्र येत जाईल. या पत्राची किमत सालीना १२ रुपये आहे. शिवाय डाकहशील नाहीं.

---

## वऱ्हाड.

मुंबईस एलफिनस्टन कालेजांत असलेले वऱ्हाडांतील गृहस्थ रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे बी. ए., रा. रा. रंगो नृसिंव्ह मुधोळकर बी. ए., व रा. रा. बळवंत आबाजी दिवेकर बी. ए. यांस कालेजांतच फेलोच्या जागा मिळाल्या. खापरडे व मुधोळकर यांस दरमहा १२० रुपये व दिवेकर यांस दरमहा ६० रुपये पगार झाला आहे असें समजतें. व त्याबद्दल आह्मांस संतोष वाटतो.

पुण्याचे रा[illegible] वऱ्हाडांत [illegible] नगी मि[illegible] बांस अ[illegible] त्यांस परवानगी मिळणार असें ऐकतो.

---

एथील मिडल क्लास स्कुलांतील फर्स्ट असिस्टंट मास्तर रा. रा. हरी धोंडदेव भाटवडेकर यांनीं पुन्हा आजारीपणाची रजा घेतली आहे व त्यांचे जागेवर रा. रा. महादाजी गंगाधर लिमये बुलढाण्याचे मा. यांस नेमिलें आहे. भाटवडेकर यांची प्रकृति अलीकडे बरेच दिवस बिघडली आहे व कित्येक वेळां त्यांनी रजा घेतलेली आहे. त्यांनीं चांगलें औषध घ्यावें व परमेश्वरानें त्यांस आरोग्य करावें असें आह्मी इच्छितों.

---

मलकापुराहून एका गृहस्थांनीं आह्मांस लिहिलें आहे कीं एथील कोर्टाची स्थिति काय झाली आहे हें आपल्यास कळलें नसेल असें नाहीं. बारा महिन्यांपासून दोन महिने बंद तर आठ दिवस शुरू, व चार महिने बंद तर एक महिना शुरू असें चाललें असल्यानें वकिलांचें तर सर्वच नुकसान होत आहे परंतु लोकांचेंही बहुत नुकसान होत आहे. हल्लींही तारीख १२ पासून कोर्ट बंद झालें आहे. कारण मे० थामसन साहेब मेहकराकडे फौजेचे सरबराईकरितां गेले ह्मणतात. तेव्हां कोर्ट तारीख १९ जानेवारी पर्यंत बंद राहील असें वाटतें. बुलढाण्यास थोडे दिवस कोर्ट चाललें होतें तेही लोकांस अतिशय गैरसोय झाली होती.

विष्णु सदाशिव पिसोळकर रेसिडेंट साहेबांचे क्लार्क आफ धि कोर्ट २४ वे तारखेस एथून उमरावतीस गेले. अकोल्याहून गेल्यापासून ते सहा वर्षांनीं पुन्हा एथें आले. व मंडळींचें त्यांचें चांगलें प्रेम होतें व तेंच त्यानीं कायम राखिलें ह्मणून येथें ते आठ दिवस होते तोंवर त्यांचा व मंडळीचा काळ मोठ्या आनंदांत गेला.

---

बेडर जातीचे शाळेकरितां पुढील वर्षाचे बजेटांत म्युनिसिप्यालिटीनें १० रुपये दरमहा देण्याचें मंजूर केलें आहे. याबद्दल आह्मांस संतोष वाटतो. लायब्ररीची देणगी १० रुपये दरमहाची होती ती म्युनिसिप्यालिटीनें कमी करण्याचा विचार केला आहे याबद्दल आह्मांस वाईट वाटतें. याबद्दल म्युनीसिप्यालिटी पुन्हा विचार करील तर चांगलें होईल.

रा. रा. वामन गोविंद जमादार मूर्तिजापुरकर यांस त्यांवरील फौजदारी मुकद्दम्यांत ८०० रुपये दंड झाला.

---

मेहकरचे तहशिलदारीवर रा. रा. सदाशिव भास्कर मेळघाटचे यांस नेमिलें व मेळघाटास इलिचपुरचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. परशराम गणेश यांस व त्यांचे जागीं जुडिशियल कमिशनरचे डिपुटी क्लार्क रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर यांस नेमिलें. जु. क. आफिसांत मि. महमद इस्मायल डिपुटी कमिशनरचे डिपुटी क्लार्क यांस नेमून वर्गावर्गीनें त्यांची जागा भरणार आहेत असें ह्मणतात.

---

अलिशान रेसिडेंट साहेबांची स्वारी २४ [illegible] साहेबांस विड्यास बोलाविणार आहेत. उमरावतीसही सुशोभित कमानी व निशाणें [illegible] थाट चांगला केला आहे. ३१ वे तारखेस हाय स्कुलाचे बक्षिसाचा समारंभ होणार [illegible] प्रसंगीं अध्यक्षस्थानीं रेसिडेंट साहेब [illegible] आहेत. पहिल्या तारखेस मोठा दरबार होऊन रात्रीं बाल होणार आहे. व दुसरे तारखेस स्वारी इलिचपुरास जाणार.

---

इकडील युरोपियन मंडळी नाताळचे सुटीकरितां व दरबाराकरितां उमरावतीस गेली आहे. रा. ब. नारायणभाई दांडेकर व मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. हेही जाणार आहेत.

---

इलिचपुरची कंटिंजंट पलटण अफगाणिस्थानावर जाणार आहे.

---

एथें ताबुद पडण्याचे दिवशी पेठेंतील मुसलमान लोक व चीफ कान्स्टेबल यांचा तंटा झाला. त्या कामीं मि० डेविस साहेब असिस्टंट कमिशनर व रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ पोलिस इन्स्पेक्टर यांनीं त्या जागीं जाऊन लोकांची समजूत घालून तंटा मिटविला व ताबूद सुरळीतपणें नदीवर पोचविले.

---

रा. रा. पांडुरंग दामोदर दवणकर मास्तर यांनीं आणखी ५ महिन्यांचे रजेचा अर्ज केला आहे.

सरकारानें कोर्टें लोकांच्या [illegible] केलीं असून त्यांविषयीं असा बो[illegible] रणें हें मोठें दोषास्पद आहे. मागें [illegible] व कोर्टविषयीं आह्मी लिहिलें [illegible] लकापूर कोर्टाविषयीं सदरप्रमा[illegible] आहे. अडगावचें कोर्ट प्रस्तुत [illegible] आहे. व अकोल्यास ही कांहीं दिवस असिस्टंट कमिशनरकडे, व कांहीं दिवस स्मालकाज कोर्टाकडे कामाचा फेरमोबदला होत असतो. असें नसावें व सर्वत्र सुरळीत काम चालून रयतेस वक्तशीर इनसाफ मिळावा अशी आमची इच्छा आहे. वरिष्ठ अधिकारी इकडे कान देवोत.

---

## वर्तमानसार.

काबूल—कडील गडबड अजून मिटली नाहीं. मागे १२।१३ व १४ तारखेस लढायां झाल्याविषयीं लिहिलें आहे त्याप्रमाणें च १८ वे व १९ वे तारखेस लढाया झाल्याचें वर्तमान आलें आहे. काबुली लोकांचे मनांत धर्मसंबंधी वेड शिरलें आहे व त्यांनीं गडबड मांडली आहे. १८ वे तारखेचे लढाईंत त्यांचे बरेच सरदार मरण पावले. इकडील एक आफिसर मेला व एक दोन लोक जखमी झाले, १९ वे तारखेसही शत्रूचे लोक बरेच मेले व इकडील थोडे लोक जखमी झाले. शत्रूकडील अजीमतुल्ला खान सरदार जखमी झाला. याकुबखानाची बायको शत्रूस द्रव्याची मदत करीत आहे. व तिचा वडील मुलगा मुसाखान यास शत्रूनीं अमीर बनविलें आहे. इंग्लिश फौजेंत येऊन मिळालेले वलिमहमद वगैरे काबुली सरदार यांचीं घरें [illegible] शत्रूनीं लुटलीं. पेजवाल व जगदल यांचे [illegible] करण्यांत आली आहे. [illegible] ड्यांधरून आहेत. त्यां[illegible] छाती नाहीं. जनरल राबर्ट [illegible] हिंदुस्थान सरकारास कांहीं [illegible] पाठ[illegible]विषयीं लिहिलें आहे, थोडे [illegible] कि[illegible] जखमी झाले यामुळें फौजेंत तूट आली आहे. बाकी राबर्ट साहेबांस उमद चांगली आहे. व लवकरच यथास्थित सर्व बंदोबस्त होईल असें ते अनुमान करीत आहेत.

व्हाइसराय साहेबांवर बंदूक उडविणारा मनुष्य वेडा ठरला.

वासुदेव बळवंत फडके याचें अपील हाय कोर्टानें नामंजूर केलें.

सिंदगी तालुक्यांतील एका बाईनें पोटास नसल्यामुळें शेजारणीचें मूल शिजवून खाण्याकरितां डेरक्यांत घातलें होतें. याजबद्दल तिजवर शाबिती होऊन सेशन कोर्टांत तिला फांशीची शिक्षा होऊन तिला हायकोर्टाची मंजुरीही मिळाली. हर!हर! कोण हा दुष्काळाचा कहर!!

संस्थान कागल व मुधोळ येथील चीफ हल्लीं पुणें येथें आले असून जमखिंडीकर पटवर्धन यांचीही स्वारी लवकरच येणार आहे असें ह्मणतात.

बहारचे जमीनदार लोक आपापसांत वर्गणीनें पैसा जमवून काबुलांतील फौजेस थंडीकरितां कपडे बक्षीस पाठविण्याचा उद्योग करीत आहेत असें समजतें.

चालू साली घांटावर उत्तम पाऊस लागल्यामुळें तिकडे बरीच स्वस्ताई होत चालली आहे. बेळगांव येथें हल्लीं तांदूळ दर रुपयास १५ शेर मिळतात. याहून पुढें स्वस्ताई होईल असा अजमास आहे.

मि. काशिनाथ महादेव थत्ते, सातान्याचे डे. क. हे आपले मुलास सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचे अभ्यासाकरितां विलायतेस पाठविणार असें समजतें. खरें असेल तर हें अत्यंत आल्हादकारक होय. इं. प्र.

हरकत दूर झाली— अलिकडे बरेच दिवस १८३५ च्या पूर्वीचे रुपये व वुइलियम थर्ड किंवा फोर्थचा मुखवटा ज्या रुपयावर आहे तो अगर ते रुपये सराफांनीं किंवा साधारण कोडतांतूनही न घेण्याची वहिवाट बऱ्याच प्रकारें पडत जाऊन हल्लीं तर बिलकुलच न घेण्याची चाल पडली होती, परंतु ही चूक कोणत्याही प्रकारें गवर्मेंटची नसून विनाकारण लोकांस त्रास सोसावा लागत असे. हा त्रास प्रजेस न पडावा ह्मणून मुंबई सरकारानें पूर्वी चालत आलेल्या रिवाजाप्रमाणें रुप्याचें सर्व प्रकारचे नाणें चालण्यास हरकत नाहीं, अशाबद्दल गेल्या गुरुवार तारीख १८ डिसेंबरच्या मुंबईच्या सरकारी ग्याझिटांत सर्व लोकांस समजण्याकरितां जाहिर केलें आहे तिकडे सरकारी, सावकारी व इतर प्रकारचे धंदे करणार लोकांनी लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

कबूल एथील माजी रेसिडेंट सर लुई क्याव्हगनारी यांचे विधवेस दर साल ५ हजार रुपये पेनशन व मातुश्रीस दर साल १ हजार रुपये पेनशन देण्याचा विशेष ठराव हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यार्णी केला आहे. ज्ञा. प्र.

सर रिचर्ड टेंपल साहेब यांची स्वारी गेल्या रविवारीं रात्रीं आफगाणिस्थानांत फिरून मुंबईस सुखरूप येऊन पोंचली.

मुंबईहून १०,३६२ रुपये किंमतीच्या याची बंगी मि० ई. डी. सासून यांनीं कलकत्यास पाठविली. कलकत्यास बंगी जाऊन पोंचली, परंतु आंतील सोनें नाहींतें झालें. ह्मणून हल्लीं तेथें पोलिस मार्फत चौकशी सुरू आहे. पोस्ट मास्तरलजनर यांनीं पत्ता लावून देईल त्यास १००० रुपये बक्षीस देण्याचें कबूल केलें आहे.

मुंबईतील युनिसिपल कमिटीच्या मार्केटांत पाटीवाले भाजी वगैरे पदार्थ विकण्यास बसतात व त्यांजवळून होणाऱ्या उत्पन्नाचा लिलाव गेल्या बुधवारीं क्राफर्ड मार्किटांत झाला. चार मार्किट मिळून एकंदर लिलाव १८,१५५ रुपयांस गेले.

अमेरिकेंतील न्यूयार्क शहरांत सन १८८३ सालीं मोठें प्रदर्शन करण्याकरितां उद्योग चालला आहे.

रंपामधील दंगा अद्यापि कायम आहे. त्याच्या प्रमुख मंडळीपैकीं एकजण हातीं लागला आहे तो चंद्रिया वगैरेचीं ठिकाणें दाखवून देईन ह्मणतो परंतु त्याच्या ह्मणण्याप्रमाणें अद्यापि कांहीं झालें नाहीं. गेलेल्या फौजेपैकीं पुष्कळ लोक अजारी मात्र पडले आहेत.

लष्करी खात्याकडे लागणारे बूट आजपर्यंत विलायतेहून येत होते, ते न आणवितां येथच्या येथेंच करवावे, व तसें करण्यांत फायदा आहे, इतकेंच नाहीं, परंतु एथें होणारा माल विलायतेपेक्षां चांगला होतो, असें एडविन जानसन यांनीं मत दिलें आहे. कानपुर येथील मोची लोकांचा सरकारी कारखाना वाढविला ह्मणजे झालें असें यांचें मत आहे.

लधक प्रांतीं चिनई लोकांचा फार जुलूम असल्यामुळें तिकडील लोक काश्मीर प्रांतीं रहावयास येऊं लागले आहेत.

म्हैसुरास मोठमोठाल्या जागेची नवीन योजना होणार आहे. मि. रंगा चार्लू यांस दिवाण, व मि. माधवराव यांस त्यांचे असिस्टंट सेक्रेटरी नेमणार. मि. शेषाद्री आयर यांस रेवेन्यु कामिशनर नेमणार.

हिंदुस्थानच्या सिविल सर्विसच्या परीक्षेस तारीख १५ जून सन १८८० रोजीं लंडन मध्यें सुरुवात होणार असें समजतें.

रशियाचे बादशाहा झार व त्यांचे वडील चिरंजीव यांचा मतभेद पडल्याबद्दल तार आहे. रशिया देशांत बादशाही अम्मल न ठेवितां इंग्लिशप्रमाणें लोकसत्ताक अम्मल करण्याचें झार यांचे चिरंजिवांचें सांगणें होतें. ही गोष्ट झार यांनीं ऐकली नाहीं ह्मणून परस्परांचें वाकडें पडल्या सारखें झालें आहे.

बडोदा रेल्वे कंपनीनें आपल्या रस्त्यावर येत्या जानेवारी पासून उतारूंच्या भाड्याचा दर कमी करण्याचा ठराव प्रसिद्ध केला आहे. पहिला, दुसरा व तिसरा या प्रतीचे दर प्रत्येक मैलास १५, ७, व ४ पै होते ते आतां १२, ६, व ३ पै प्रमाणें अनुक्रमें कमी केले आहेत.

अमीर याकूबखान नऊ चाकरांसह तारीख १३ रोजीं झीलम एथें पोंचले व पुढें मीरत एथें गेले.

चीन देशामध्यें युरोपियन परकी लोक ३,८१४ असून ३५१ व्यापारी कंपन्या आहेत असें समजतें.

कलकत्ता एथील युनिव्हर्सिटीच्या म्याट्रिक्युलेशन व बी. ए. ची पहिली या परीक्षांस अनुक्रमें २,६९७ व १,०४० उमेदवार होते. ने. ओ.

---

## स्नानक्रिया.

स्नानक्रिया ह्मटली ह्मणजे नेहेमी त्वचेवरच होते, ह्मणून ती त्वचा कशी बनली आहे व तिचे धर्म व निकटसंबंध हीं इतर अवयव व इंद्रियें यांजबरोबर कशीं मिळून आहेत याचा सारासार विचार करणें ह्या ठिकाणीं अवश्य आहे. मुखमार्जन प्रकरणीं तोंडावरील त्वचेचें वर्णन करतेवेळीं तिजमधील रक्तवाहिन्या, रसवाहिन्या, मज्जातंतू व त्यांचे लक्षावधि बनलेले उंचवटे, असंख्य घर्मरंध्रें व त्यांनां लागून असणाऱ्या घर्मपिंडांच्या नळ्या, तसेच रोमांच व त्यांच्याबरोबर असणार तैलपिंड व सूक्ष्म स्नायु या सर्वांचें थोडथोडें वर्णन केलेंच आहे. त्याप्रमाणेंच शरीराच्या नरम भागांचें संरक्षण, शरीरांतील उष्णतेचें संरक्षण व समशीतोष्णपणा व रंध्रद्वारें शरीरशुद्धी इत्यादि त्वक्‌धर्मांचेंही वर्णन मागील अंकीं केलें आहे. घाम एकादेवेळीं फार सुटतो किंवा मुळींच नसतो. कमी जास्त सुटणें हें हवेची उष्णता, शरीराचें कमीजास्त चलनवलन, उष्णपदार्थपान व मनाचे उद्गार ह्यांवर अवलंबून आहे तरी थोडाबहुत घाम शरीर आरोग्यदशेंत रहाण्याकरितां अवश्य आलाच पाहिजे. अगदींच न सुटला किंवा एकदम बंद झाला तर आंतील इंद्रियांत रक्तसंचय होऊन रोग उत्पन्न होतात हें बहुतेकांस माहीत आहेच. तसेंच सर्व अंगावरील घर्मरंध्रें बंद केल्यानें अथवा त्वचा पुष्कळ भाजल्यानें काय अपघात होतात हेंही सर्वांस ठाऊक आहे. त्वचेंतील रक्तवाहिन्या नेहेमीं कमीजास्त फुगल्यानें शरीरावर लाली किंवा फिकटपणा येत असतो. लहान मूल किंवा एकादी गौरवर्ण स्त्री गालांतल्यागालांत हंस्तांनां तोंडावर जी लाली मारते तिचें कारण हेंच होय, व ह्यावरून दुसरें एक असें ठरतें कीं मनुष्याचे मनोद्गार व त्वचेंतील रक्तवाहिन्या यांचा निकट संबंध आहे ह्मणूनच भयानें घाम सुटून मनुष्य निस्तेज पडतें आणि आनंद व लज्जेच्या योगानें तोंडावर लाली चढते. तर यावरून त्वचा व मोठमोठालीं मज्जामंडलें यांचा निकट संबंध आहे यास्तव एकास अपाय झाला असतां दुसऱ्यासही तसाच होणार हें सर्वांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण जितके उंचवटे त्वचेवर दिसतात तितक्यांत मज्जातंतूंचीं अग्रें आहेत. लहान बालकास गुदगुल्या केल्या ह्मणजे तें खदखदां हंसूं लागतें, थंड पाणी अंगावर एकदम टाकलें ह्मणजे थंडी वाजून दांत खडखडूं लागतात, निजलेल्या मनुष्याचे पायांचे तळवे नखानें खाजविले तर तो लाता झाडू लागतो आणि हें सर्व चमत्कार त्वचेंतील मज्जाग्रास स्पर्श होऊन तो मज्जामंडलास जाऊन पोंचतांच तेथून परत फिरून स्नायूवर येतो तेणेंकरून त्यांचें हलनचलन व हास्यादि उद्गार उत्पन्न होतात या व दुसऱ्या पुष्कळ चमत्कारांवरून त्वचा किती महत्वाची आहे हें स्पष्ट दिसून येतें.

पदार्थांचें शोषण करून घेण्याची शक्ति त्वचेंत आहे ह्याचें उदाहरण सांवतवाडी व गोमांतकांतील लोक डोकींत तेल जिरवीत असतांनां दृष्टीस पडतें. हें जिरवितांना थोडें घर्षण करण्याची जरूरी आहे. घर्षणानें तेल घर्मरंध्रांत व तैलरंध्रांत शिरून तेथें त्याचें शोषण होतें. तेल व इतर पुष्कळ पदार्थ यांचें शोषण होतें तसेंच पाण्याचें शोषण शरीराचीं रंध्रें करीत नाहींत असें पुष्कळ शारीरशास्त्रवेत्त्यांचें ह्मणणें आहे व ह्या ठिकाणीं आपणही तेंच खरें मानू. शरीर पाण्यातील क्षार शोषून घेतें असें ह्मणण्याला कांहींच आधार नाहीं कारण तसें असतें तर समुद्राचें पाणी जें गुणकारक आहे तें विषसमान झालें असतें.

सर्व प्रकारच्या स्नानापासून शरीराच्या उष्णतेचें मान कमी किंवा जास्त झाल्याशिवाय रहात नाहीं. तर निरनिराळ्या स्नानाच्या उष्णतेचा विचार करण्यापूर्वी शरीराच्या उष्णतेच्या मानाचा पूर्वी विचार करूं. शरीराच्या उष्णतेचें साधारणरीत्या पाहूं गेलें तर सर्व मनुष्यांत सर्व ऋतूंत व कटिबंधांत प्यारेनहैटच्या उष्णमापक यंत्रानें पाहिलें असतां ९८० पासून ९९० याच्या आंत असतें. तर ही शरीराच्या अंगीं समशीतोष्णता राखण्याची शक्ति किती चमत्कारिक आहे बरें ! जसें शेगडींत ऊब सर्पण जाळल्यानें उत्पन्न होते त्याचप्रमाणें मनुष्याच अंगांत गरमी उत्पन्न होण्यास अन्न व इंद्रियांतील घटकावयवांची घडामोड हीं होत, व ही गरमी कमी जास्त होणें ह्मटलें ह्मणजे अन्न कमी जास्त किंवा निरनिराळ्या प्रकारचें खाणें तसेंच कमी जास्त शरीराला मेहनत व जीवनक्रियांची अधिक उणी तीव्रता ह्या सर्व क्रियांवर अवलंबून आहे, देहांतील सर्व अवयवांत रक्तासारखा तीव्र गतीनें फिरणारा दुसरा कोणताच पदार्थ नाहीं व हेंच रक्त उष्णतेचें वाहान असल्याकारणानें ती सर्व अवयवांत सारखी पसरते. रक्तांत उष्णता कोठून येते ह्मणाल तर ती घटकावयवांच्या घडामोडीपासून उत्पन्न होते, ही घडामोड जास्त कमी होण्यास कारणभूत अवयवांस रक्ताचा कमी जास्त पुरवठा. हा पुरवठा काळजाची कमी जास्त गती व रक्तवाहिन्यांचा आकार व त्यांची मज्जा गंडळांच्या सत्तेनें आकुंचन किंवा फुगण्याची शक्ति ह्यांवर आहे. ही सर्व परंपरा खरी आहे हें पुढील वर्णनावरून नीट ध्यानांत येईल. पाठीच्या मणक्यांमध्यें ह्मणजे मानेच्या कळसापासून तों [illegible]कडहाडापर्यंत पुष्कळ मज्जातंतू मिळून एक दोर जमलेला आहे. हा मगज किंवा मेंदूपासूनच निघाला असून दोघांची रचना पाहिली असतां सारखीच आहे व ह्या दोरापासून प्रत्येक दोन मणक्यांण्या मधून उजवी व डावी अशा दोन्ही बाजूंस लहान मोठ्या दोऱ्या निघून त्यांचे पुढें तंतू होऊन ते सर्व शरीरभर पसरले आहेत. हेच सर्व मज्जातंतू व मणक्यांतील दोर व मगज हीं दोन ह्या सर्व मज्जा मंडळांचीं मुख्य स्थानें, व यांचा शरीराच्या सर्व व्यापारावर पूर्ण अंमल आहे. आतां अशा मोठ्या महत्वाच्या दोऱ्याचा वरला ह्मणजे मानेकडल्या भागाचा जर नाश केला किंवा त्यास दुखापत केली तर त्यामध्यें शरीराच्या उष्णतेचें प्रमाण सारखें ठेवण्याची शक्ति असल्याकारणानें अंग एकमद तप्त किंवा गार पडतें. ह्या अद्भुत चमत्काराचें बरोबर कारण काय तें अजून नीट समजत नाहीं. उष्णता १०९ किंवा ७६ याच्या खालीं गेली तर जिवास धोका बसल्याशिवाय रहात नाहीं. नेहमीच्या मानापेक्षां ७० च्या वर खालीं चढ उतर झाल्या तर परिणाम फार भयंकर होतात हें प्रत्येक वैद्यास माहित आहे तर शरीर आरोग्यदशेंत राहण्यास उष्णतेची सीमा इतकी अल्प आहे व असेंही असतां तिचें मान उष्ण व थंड प्रदेशांत सारखें रहातें हें ऐकून आमचे वाचकांस आश्चर्य वाटेल यांत नवल तें कोणतें ! अंगास घास सुटून त्याची बाफ होते तसेंच श्वासावाटे बाफ निघून सर्वांगास थंडावा येतो हें समजून घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं थेंडसें कोलोवाटर आपल्या त्वचेवर कोठें तरी टाकून त्यावर तोंडानें फुंक मारावी ह्मणजे त्या जागेवर किती गार वाटतें तें समजेल. हा गारपणा कोलोनवाटरची बाफ होऊन तें उडून गेल्यामुळें वाटतो. दुसरें कारण असें आहे कीं आपल्या सभोंवते जे जड पदार्थ आहेत त्यांच्यांत आपल्या शरीरापेक्षां उष्णता जर कमी असली तर ते आपल्या अंगांतील उष्णतेचा कांहीं अंश आपाणामध्यें ओढून घेतात व अशा योगानें आपलें अंग थंड ठेवतात.

सु. प.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.